cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७३ | शनिवार दि.१२ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### एमपीएससीच्या विश्वासाला लागलेली गळती!


पेपरफुटी, परीक्षांचे वारंवार पुढे ढकलणे, अध्यक्षांवरील आरोप आणि विद्यार्थ्यांचा वाढता असंतोष; एसआयटी हा शेवट नसून सरकारच्या जबाबदारीची सुरुवात आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजे केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा नव्हे; राज्याच्या प्रशासनात गुणवत्तेच्या आधारे प्रवेश मिळण्याचा तो विश्वासाचा मार्ग आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षा रद्द होणे आणि तारखा वारंवार बदलणे या घटना केवळ प्रशासकीय चुका म्हणून झटकून टाकता येणार नाहीत. त्या संपूर्ण भरती प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.ऑगस्टमध्ये औषध निरीक्षक आणि गट–ब भरतीची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. त्यानंतर पुण्यात हजारो उमेदवार रस्त्यावर उतरले. अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्यापासून प्रश्नपत्रिकेच्या फॉरेन्सिक तपासणीपर्यंत अनेक मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या.

# कर्जमाफीच्या दुसऱ्या यादीत ३ लाख ५५ हजार शेतकरी

**आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे सहकारमंत्र्यांचे आवाहन; पहिल्या यादीतील १२.५८ लाख शेतकऱ्यांना १०,११४ कोटींचा लाभ**

मुंबई । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणासाठीची दुसरी यादी शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत तब्बल ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. संबंधित शेतकऱ्यांनी यादीत आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे.**



### विभागनिहाय पात्र लाभार्थी

दुसऱ्या यादीतील विभागनिहाय लाभार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

* छ.संभाजीनगर विभाग–१ लाख ९५ हजार ८९९.
* अमरावती विभाग – ७१ हजार ७९६.
* नागपूर विभाग – ३४ हजार ५२०.
* नाशिक विभाग – २५ हजार ४७१.
* पुणे विभाग – २३ हजार ११७.
* कोकण विभाग – ४ हजार ८११.

दुसरी यादी जिल्हानिहाय आणि बँकनिहाय प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतींमध्येही ती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना आपले नाव तपासणे सुलभ होणार आहे. पहिल्या यादीतील शेतकऱ्यांना १० हजार कोटींची कर्जमाफी या योजनेअंतर्गत पहिल्या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १२ लाख ५८ हजार शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर १० हजार ११४ कोटी ९० लाख रुपये कर्जमुक्तीची रक्कम ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### मोदी व्लादिमीर पुतीन यांची भेट

दिल्लीः नवी दिल्ली येथे शुक्रवारी झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली; या चर्चेत संरक्षण, ऊर्जा आणि व्यापार या मुद्द्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून रशियाबाहेर आयोजित ब्रिक्स शिखर परिषदेत व्लादिमीर पुतिन यांचा हा पहिलाच प्रत्यक्ष सहभाग होता. दुपारी ३.३० वाजता सुरू झालेल्या या चर्चेत संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्रातील सहकार्य बळकट करण्यासोबतच व्यापार, गुंतवणूक आणि जनसंपर्क (लोकांमधील परस्पर संबंध) वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. इराणमधील संघर्षामुळे निर्माण झालेल्या संकटकाळात भारताला इंधनाचा स्थिर पुरवठा हवा असल्याने ऊर्जा क्षेत्रातील सहकार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. रशिया हा एक प्रमुख धोरणात्मक भागीदार आणि महत्त्वाचा ऊर्जा पुरवठादार देश आहे.

### मुलगा, सुनेला घरातून बाहेर काढण्याचा अधिकार

प्रयागराजः ज्येष्ठ नागरिकांच्या अधिकारांसंदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांच्या जिवाला किंवा मालमत्तेला धोका निर्माण झाल्यास माता–पिता आणि ज्येष्ठ नागरिक देखभाल अधिनियम २००७ अंतर्गत बनवण्यात आलेल्या न्यायाधिकरणाला मुलगा आणि सुनेला घरातून बाहेर काढण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती जे.जे. मुनीर आणि न्यायमूर्ती इंद्रजीत शुक्ला यांच्या खंडपीठाने कानपूरचे रहिवासी श्यामजी शुक्ला यांची याचिका स्वीकारताना हे निरीक्षण नोंदवले. याचिकाकर्ते श्यामजी शुक्ला हे राहत्या घराचे मालक असून ती त्यांची स्वतः कमावलेली मालमत्ता आहे. त्यांचा मुलगा पीयूष शुक्ला आणि सून प्रीती शुक्ला त्यांच्याशी गैरवर्तन, शिवीगाळ आणि मारहाण करतात, तसेच त्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, असा गंभीर आरोप शुक्ला यांनी केला होता.

### गायकवाड यांच्याविरोधात तत्काळ गुन्हा दाखल करा

पुणेः महिलांविषयी अपशब्द वापरल्याबद्दल संतोष पंडित यांच्याविरोधात तक्रार दाखल करून घेण्याबाबत पोलिस प्रशासनाकडून जी तत्परता दाखविण्यात आली, तीच तातडी महिलांवर आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्या आ. संजय गायकवाड यांच्याबाबत दाखवली गेली पाहिजे. म्हणूनच हा दुजाभाव सोडून गायकवाड यांच्याविरोधात तत्काळ गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी सोनाली त्रिंबक कांबळे यांनी पत्रकार परिषदेत केली. 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना आमदार संजय गायकवाड यांनी फोनवरून अश्लील शिवीगाळ केली होती, त्याकडे लक्ष वेधत सोनाली कांबळे म्हणाल्या, मी मागच्या ५ सप्टेंबरला मी सहजपणे मोबाईल उघडला. मोबाईलमधील रिल बघत असताना संबंधित व्हिडीओ समोर आला. तो पाहत असताना माझ्या मनास लज्जा उत्पन्न झाली. असा प्रकार कुणाबाबतही होऊ नये, याकरिता मी कोथरूड पोलीस ठाण्याकडे धाव घेतली. त्यानंतर तुमचा अर्ज लिहून आणा. आम्ही तुमचा गुन्हा नोंद करतो, असे मला सांगण्यात आले. म्हणून मी अर्ज लिहून दिला. परंतु, यानंतरही मला उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली.

# सरकारची परवानगी असो वा नसो, मुंबईकडे कूच करणारच–मनोज जरांगे



जालना । प्रतिनिधी

सरकारने आमचा अधिकार हिरावून घेऊ नये. कायद्याला धरून आम्ही उपोषण करण्यासाठी अर्ज केला आहे. न्यायदेवतेचे नियम सरकारने देखील पाळले पाहिजे. आम्ही लोकशाही मार्गाने शांततेने आंदोलन करणार आहे. राज्य सरकारने परवानगी दिली किंवा नाही, तरीही आपल्या मागण्यांसाठी मुंबईकडे कूच करणारच असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केले.

गेल्या १४ दिवसांपासून अंतरवाली सराटीत मराठा आंदोलक मनोज जरांगे हे उपोषण करत आहेत. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली ◀◀ पान २ वर

### मुंबईतील मराठा आंदोलन रोखण्यास न्यायालयाचा नकार

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे कार्यकर्ते मनोज जरांगे यांनी नियोजित केलेल्या मुंबईतील आंदोलन आणि मोर्चावर बंदी घालण्यास मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्टपणे नकार दिला आहे. मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, भारत हा लोकशाही देश आहे आणि शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा कायदेशीर आणि मूलभूत अधिकार आहे. या सुनावणीदरम्यान, याचिकाकर्त्यांचे वकील मयूर खांडेपारकर यांनी आपला युक्तिवाद मांडला. त्यांनी नमूद केले की, मनोज जरांगे सध्या मुंबईपासून सुमारे ५०० किलोमीटर दूर असलेल्या जालना येथे आहेत. वकिलांनी निदर्शनास आणून दिले की, मागच्यावेळी आंदोलकांनी रस्ते अडवले होते, ज्यामुळे केवळ सामान्य जनतेलाच नव्हे तर न्यायाधीशांनाही न्यायालयात पायी जावे लागले होते. या युक्तिवादांवर मुख्य न्यायमूर्तींनी निरीक्षण नोंदवले की, आंदोलक अजून मुंबईत पोहोचलेले नसल्यामुळे त्यांच्यावर आगाऊ बंदी घालण्यात काहीच तर्क नाही.

# साखर, मीठ आणि फॅट जास्त असणारे पदार्थ धोकादायकच !

**अशा खाद्यपदार्थांच्या पॅकेटवर आता दिसणार रेड अलर्ट**

नवी दिल्ली । वृत्तसंस्था




तुम्हीही पॅकेज्ड फूड खाण्याचे शौकीन असाल, तर यापुढे खाद्यपदार्थ खरेदी करताना चव आणि ब्रँडसोबतच पॅकेटवर असलेल्या रेड अलर्टवरही लक्ष द्यावे लागू शकते. पॅकेज्ड खाद्यपदार्थांमध्ये साखर, मीठ किंवा फॅटचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक असल्यास पॅकेटच्या पुढील भागावर स्पष्ट आरोग्य इशारा देण्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. या प्रकरणात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण आणि याचिकाकर्त्यांचे वकील राजीव द्विवेदी यांच्या प्रस्तावांमध्ये महत्त्वपूर्ण मतभेद असल्याचे समोर आले आहे.

एफएसएसएआयने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात खाद्यपदार्थांच्या पॅकेटच्या पुढील बाजूस लाल रंगाचा षटकोनी लेबल लावण्याचा प्रस्ताव दिला आहे. या आरोग्य इशाऱ्यावरील अक्षरांचा आकार पॅकेटच्या मागील बाजूस असलेल्या पोषणमूल्याच्या तक्त्यापेक्षा एक पॉइंट मोठा असावा, असे एफएसएसएआयने म्हटले आहे. एफएसएसएआयच्या सुरुवातीच्या प्रस्तावानुसार, एखाद्या पॅकेज्ड खाद्यपदार्थात साखर, ◀◀ पान २ वर

# कोणत्याच राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही राहिली नाही!

**पृथ्वीराज चव्हाण यांचे वक्तव्य; केली 'ही' मोठी मागणी**

पुणे । प्रतिनिधी



देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी लोकशाहीच्या सद्यस्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. ''आज जे काही चालले आहे, त्याला लोकशाही म्हणायला फार मोठे धाडस लागेल. पैशांचा जो गैरवापर सुरू आहे, त्याला आपण लोकशाही म्हणू शकतो का?'' असा सवाल चव्हाण यांनी उपस्थित केला. तसेच देशातील कोणत्याही राजकीय पक्षात आता अंतर्गत लोकशाही शिल्लक राहिलेली नाही, असे मोठे वक्तव्य त्यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या आधारे देशात लोकशाही व्यवस्था राबवली जात असल्याचे ◀◀ पान २ वर

# पुढील दोन वर्षांत जालना जिल्ह्यातील पाचशे जिप.शाळांचा दर्जेदार विकास करा

**आढावा बैठकीत पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे निर्देश**

मुंबई । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून करून देण्यासाठी सर्वसमावेश आराखडा तयार करावा. पुढील दोन वर्षांत जिल्ह्यातील पाचशे शाळांचा दर्जेदार विकास करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. नवीन वर्षात नवी शाळा' या संकल्पनेसह राज्याने आदर्श घ्यावा असे काम करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

◀◀ पान २ वर

### नवीन वर्षात नवी शाळा...

'नवीन वर्षात नवी शाळा' ही संकल्पना घेऊन संबंधित यंत्रणांनी अभियान स्वरूपात काम करावे. शाळांच्या विकासकामांबाबत पुढील आढावा बैठक आपण स्वतः जालना येथे घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजनांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचाही आढावा घेतला. या योजनांसाठी उपलब्ध निधी निर्धारित वेळेत खर्च करावा. मंजूर कामांना कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेऊन ती गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०८ सप्टेंबर २०२६


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५१.५० क्विंटल | २,६५१ | ३,००० | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४९.०० क्विंटल | २,६५० | ५,६२३ | ३,५२९ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ८,३७० | ८,३७० | ८,३७० |
| बाजरी: ११४.०० क्विंटल | २,६२० | ३,१२१ | २,७९८ |
| मुग: ७.०० क्विंटल | ८,२१० | ९,५११ | ९,१४४ |
| सोयाबीन: २९.५० क्विंटल | ६,०११ | ६,०११ | ६,०११ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१५० | ६,०७६ |

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारू, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्किझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
सौ.संध्या श्रीराम टेकाळे(शिंदे) मुख्याध्यापिका मो.९४२१३४८४७४
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते मो.9075387638
सौ.डॉ.जयश्री रोहन मालुरे(टेकाळे) M.B.B.S. मो.७७४३९९०९८८ विठाई हॉस्पिटल,कळंब
डॉ.रोहन मालुरे M.B.B.S.,MD,Medicine विठाई हॉस्पिटल,कळंब मो.९८६०५६०५५७




### डॉक्टरांना मारहाण आमदार पुत्राला अटक

मुंबई । प्रतिनिधी



पालघरमधील रिलीफ हॉस्पिटलमध्ये दहीहंडीच्या दिवशी झालेल्या मारहाण आणि तोडफोड प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. शिवसेना आ. राजेंद्र गावित यांचा मुलगा रोहित गावित याला पालघर पोलिसांनी अटक केल्याची माहिती समोर आली आहे. मिरा रोड येथील जीसीसी क्लबमधून पोलिसांनी रोहित गावित याला ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

रुग्णालयातील कर्मचारी आणि डॉक्टरांना मारहाण केल्याच्या या प्रकरणात पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर रोहित गावित यांच्यासह अन्य आरोपींचा पोलीस शोध घेत होते. अखेर पोलिसांनी रोहित गावित याला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. दहीहंडीच्या ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# एमपीएससीच्या विश्वासाला लागलेली गळती!

पेपरफुटी, परीक्षांचे वारंवार पुढे ढकलणे, अध्यक्षांवरील आरोप आणि विद्यार्थ्यांचा वाढता असंतोष; एसआयटी हा शेवट नसून सरकारच्या जबाबदारीची सुरुवात आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजे केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा नव्हे; राज्याच्या प्रशासनात गुणवत्तेच्या आधारे प्रवेश मिळण्याचा तो विश्वासाचा मार्ग आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षा रद्द होणे आणि तारखा वारंवार बदलणे या घटना केवळ प्रशासकीय चुका म्हणून झटकून टाकता येणार नाहीत. त्या संपूर्ण भरती प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

ऑगस्टमध्ये औषध निरीक्षक आणि गट-ब भरतीची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. त्यानंतर पुण्यात हजारो उमेदवार रस्त्यावर उतरले. अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्यापासून प्रश्नपत्रिकेच्या फॉरेन्सिक तपासणीपर्यंत अनेक मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या. सरकारकडून आश्वासने मिळाली, बैठका झाल्या; मात्र विद्यार्थ्यांचा असंतोष कमी झालेला नाही. कारण आता प्रश्न एका परीक्षेचा राहिलेला नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत झाला आहे. त्यातच गट-क संयुक्त पूर्व परीक्षेची तारीख पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. १२ जुलै, त्यानंतर २७ सप्टेंबर, २५ ऑक्टोबर आणि आता ३ जानेवारी २०२७ अशी तारीख बदलत गेली. परीक्षा कधी होणार, निकाल कधी लागणार आणि नियुक्ती कधी होणार, या अनिश्चिततेत हजारो उमेदवारांचे वर्षानुवर्षांचे नियोजन अडकले आहे. परीक्षा पुढे ढकलण्याचे प्रशासकीय कारण काहीही असो; प्रत्येक बदलामुळे उमेदवारांचा वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा खर्च होते. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी ११ सप्टेंबरला पत्रकार परिषदेत ३४ पानी सादरीकरण करत भिमनवार यांच्या यापूर्वीच्या परिवहन आयुक्तपदाच्या कार्यकाळाबाबत विविध आरोप केले. एचएसआरपी क्रमांक प्लेट, वाहन इंटरसेप्टर, जीपीआरएस किट तसेच पदोन्नतीशी संबंधित मुद्दे त्यांनी उपस्थित केले. हे आरोप आहेत; त्यांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. भिमनवार यांनी हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत त्यांचा इन्कार केला असून प्रश्नपत्रिका फुटण्याची घटना आपल्या अध्यक्षपदाच्या आधीची असल्याचे म्हटले आहे. मात्र इथे व्यक्तिपेक्षा व्यवस्था महत्त्वाची आहे. आरोप खरे की खोटे, हे तपासातून स्पष्ट होईल. पण तपासच झाला नाही, तर संशय कायम राहणार. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२५च्या गट-ब आणि गट-क परीक्षांमधील पेपरफुटी व अनियमिततेची एसआयटी चौकशी जाहीर केली आहे. उत्तरपत्रिकांची फेरतपासणी, मुलाखती पुढे ढकलणे आणि परीक्षा प्रक्रियेत सुधारणा सुचवण्यासाठी समिती नेमणे, असे निर्णयही घेण्यात आले आहेत. अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी मात्र ठोस पुरावा नसल्याने सरकारने स्वीकारलेली नाही. एसआयटी नेमणे हा निर्णय स्वागतार्ह आहे; पण तोच अंतिम उपाय समजण्याची घाई सरकारने करू नये. चौकशीचा अहवाल येईपर्यंत प्रश्न अनुत्तरितच राहतील. दोषी कोण, प्रश्नपत्रिका कुठे फुटली, माहिती कुणाकडे पोहोचली, आर्थिक व्यवहार झाले का आणि या प्रक्रियेत कोणकोणत्या पातळीवर निष्काळजीपणा झाला, याचा माग काढणे आवश्यक आहे. केवळ काही कर्मचाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण संपवणे म्हणजे व्यवस्थेतील छिद्र तसेच ठेवणे होईल. पेपरफुटीच्या कथित प्रकरणात कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीचे आरोप झाले आहेत. असे आरोप असतील तर तपास फक्त प्रश्नपत्रिकेपुरता मर्यादित न राहता आर्थिक व्यवहारांपर्यंत पोहोचला पाहिजे. पैसा कोणाकडून आला, कुठे गेला आणि त्यामागे कोणाचे हितसंबंध होते, याचा मागोवा घेतल्याशिवाय पेपरफुटीची साखळी उलगडणार नाही. एमपीएससीच्या परीक्षा पारदर्शक असणे ही केवळ आयोगाची जबाबदारी नाही. सरकारनेही त्यासाठी कठोर सुरक्षा व्यवस्था, तांत्रिक नियंत्रण, जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा आणि उमेदवारांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणारी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. समित्या, चौकशा आणि आश्वासने यापेक्षा महत्त्वाचे आहे ते म्हणजे दोषीपर्यंत पोहोचणारी कारवाई आणि भविष्यात अशी घटना पुन्हा घडणार नाही याची हमी. कारण एमपीएससीच्या प्रश्नपत्रिकेची गळती ही कागदाची गळती नाही; ती विश्वासाची गळती आहे. आणि हा विश्वास परत मिळवण्यासाठी केवळ परीक्षा घेणे पुरेसे नाही. परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता पुन्हा सिद्ध करावी लागेल. एसआयटी हा उत्तराचा शेवट नाही; तो उत्तर शोधण्याची सुरुवात आहे.

# अंबड शहरातील राष्ट्रीय महामार्गाने घेतला मोकळा श्वास!

## २२५ अतिक्रमणे हटविली; उर्वरित ७५ वर उद्या कारवाई

जालना । प्रतिनिधी

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक एनएच-७५३ एच जालना- वडीगोद्री रस्त्यावरीलअंबड शहरातील अतिक्रमणांविरोधात प्रशासनाच्यावतीने धडक कारवाई करण्यात आली. महामार्गाच्या हद्दीत असलेल्या एकूण सुमारे ३०० अतिक्रमणांपैकी २२५ अतिक्रमणे दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी हटविण्यात आली असून, उर्वरित ७५ अतिक्रमणांवर उद्या कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.**

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या समन्वयाने धडक कारवाई जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल (भा.प्र.से.), पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू (भा.पो.से.) तसेच कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या संयुक्त पथकाने अतिक्रमण हटविण्याची धडक मोहीम राबविली. या कारवाई मध्ये उपविभागीय अधिकारी अंबड, पोलिस उप अधीक्षक अंबड व तसेच उपअभियंता रा. म. उपविभाग यांच्या



समन्वय पथकाने सक्रिय सहभाग घेतला. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे हटविण्याची प्रभावी कार्यवाही करण्यात आली. ३०० अतिक्रमणांपैकी २२५ अतिक्रमणे हटविली; उर्वरित ७५ अतिक्रमणांवर उद्या होणार कारवाई एनएच-७५३ एच च्याअंबड शहर हद्दीत एकूण ३०० अतिक्रमणे निदर्शनास आली होती. त्यापैकी २२५ अतिक्रमणे आज रोजी हटविण्यात आली असून, उर्वरित ७५ अतिक्रमणांवर उद्या कारवाई करण्यात येणार आहे. या कारवाईमुळे राष्ट्रीय महामार्गाची हद्द अतिक्रमण मुक्त होऊन वाहतूक सुरळीत होण्यास, रस्त्याची सुरक्षितता वाढण्यास आणि नागरिकांना सुरक्षित व मोकळा मार्ग उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. अतिक्रमण हटविण्याची ठळक कामगिरी राष्ट्रीय महामार्ग एनएच-७५३ एच ठिकाण अंबड शहर एकूण अतिक्रमणे ३०० हटविण्यात आलेली अतिक्रमणे २२५ उर्वरित अतिक्रमणे ७५ राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना, महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त सहकार्याने ही मोहिम राबविण्यात येत आहे.

# आर्थिक मानसिक समस्यांमुळे आत्महत्या-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

**दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन म्हणून पाळला जातो. मानसिक आरोग्य, नैराश्य आणि जीवन संपवण्याच्या विचारांमधून लोकांना बाहेर काढण्यासाठी जनजागृती करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंध संस्था आणि जागतिक आरोग्य संघटना यांनी ही संकल्पना निश्चित केली आहे.**



७,२०,०००हून अधिक जगभरात व्यक्ती दरवर्षी आत्महत्या करतात. प्रयत्नांचे प्रमाण: प्रत्यक्षात आत्महत्या करणाऱ्या एका व्यक्तीमागे किमान २० हून अधिकजण आंत्महत्येचा प्रयत्न करत असतात. तरुण वर्ग सर्वाधिक असुरक्षित : १५ ते २९ या वयोगटातील तरुणांमध्ये मृत्यूचे हे जगातील तिसरे मोठे कारण आहे. आर्थिक पार्श्वभूमी : जागतिक स्तरावरीलङ्गङ्गएकूण आत्महत्यांपैकी सुमारे ७३ टक्के आत्महत्या या कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या विकसनशील देशांमध्ये नोंदवल्या जातात. भारतातील वास्तव : नॅशनल क्राईम रेकॉर्डस्? ब्युरोच्या माहितीनुसार देशात दरवर्षी १.७० लाखांपेक्षा जास्त मृत्यूंची नोंद * १२% लिंग गुणोत्तर आत्महत्या दर सरासरी (दर १ लाखांमागे) ७२% पुरुष २८% महिला कौटुंबिक कलह व नातेसंबंध : एकूण घटनांपैकी सुमारे ३० टक्के कारणे कौटुंबिक अडचणींशी संबंधित असतात., शारीरिक व मानसिक आजार : १८ ते २० टक्के प्रकरणांमध्ये आजारपण किंवा तीव्र नैराश्य कारणीभूत असते., आर्थिक विवंचना व बेरोजगारी : कर्जबाजारीपणा, व्यवसायातील तोटा किंवा दारिद्र्य., व्यसनाधीनता : दारू किंवा इतर अमली पदार्थांच्या आहारी जाणे (सुमारे ६ टक्के), महाराष्ट्राची स्थिती देशात अव्वल : भारतात सर्वाधिक आत्महत्यांची नोंद महाराष्ट्रात होते. देशातील एकूण आत्महत्यांपैकी १३ टक्केहून अधिक वाटा एकट्या महाराष्ट्राचा आहे (दरवर्षी २२,००० पेक्षा जास्त घटना)., शेतकरी व शेतमजूर : कृषी क्षेत्रातील महाराष्ट्र आघाडीवर असून देशातील एकूण कृषी क्षेत्रातील आत्महत्यांपैकी ३५ टक्के पेक्षा जास्त आत्महत्यांमध्येही प्रमाण महाराष्ट्रात नोंदवले जाते असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# मुख्यमंत्र्यांनी मंदिरात मासे खाल्ले; पश्चिम बंगालमध्ये 'शाकाहारी-मांसाहारी' वाद पेटला

कोलकाता । वृत्तसंस्था

**पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी कोलकात्यातील शेकडो वर्षे जुन्या कालीघाट मंदिरात माशाचे भोजन घेतल्यानंतर या परंपरेची चर्चा रंगली आहे. त्यामागे गेल्या आठवड्यापासून सुरू असलेला शाकाहारी-मांसाहारी हा वादही कारणीभूत ठरला आहे. दुर्गापूजेदरम्यान मांसाहार करणाऱ्या बंगाली हिंदूंवर एका हिंदू धर्मगुरूंनी टीका केली होती.**

देशातील इतर भागांत मंदिरात मांसाहार केल्यास धार्मिक प्रमुखांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जाते. मात्र, पश्चिम बंगालमधील काही मंदिरांमध्ये मांसाहारी पदार्थांचा नैवेद्य देण्याची आणि तो प्रसाद म्हणून ग्रहण करण्याची शतकानुशतकांची परंपरा आहे. त्यामुळे बंगालमधील काही मंदिरांमध्ये ही एक सामान्य बाब आहे. कौशिकी अमावस्येनिमित्त मुख्यमंत्री अधिकारी यांनी काल सायंकाळी कालीघाट मंदिराला भेट दिली. शाक्त हिंदूंसाठी हा दिवस विशेष महत्त्वाचा मानला जातो. यावेळी ते मंदिरातील प्रसाद ग्रहण करत असल्याचा व्हिडिओ समोर आला. यामध्ये माशाचे डोके, तळलेला मासा आणि बासंती पुलाव यांचा समावेश होता. कालीघाट मंदिरात देवी कालीला मासे तसेच बोकडाच्या मांसाचा नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. हा नैवेद्य नंतर भाविक प्रसाद म्हणून ग्रहण करतात. बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र शास्त्री (बागेश्वर बाबा) यांनी दुर्गापूजेच्या काळात बंगाली हिंदूंनी मांसाहार टाळावा, असे आवाहन केले होते. दुर्गापूजेच्या काळात मांसाहार करणाऱ्या बंगाली हिंदूंना त्यांनी 'ढोंगी' असेही म्हटले होते. ''मांसाहारी पदार्थांची विक्री बंद व्हावी असे कोणाला वाटते? मोबाईल फोनची फ्लॅशलाइट सुरू करून ते दाखवा. हा संदेश पश्चिम बंगालमधील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचला पाहिजे. सरकारलाही याची जाणीव करून दिली पाहिजे. दुर्गापूजेच्या काळात पश्चिम बंगालमधील मांस आणि मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवली पाहिजेत,'' असे शास्त्री यांनी म्हटले होते. या वक्तव्यामुळे काही बंगाली समाजात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. कारण बंगालमध्ये दुर्गापूजेच्या काळात मांसाहार करण्याची परंपरा असून, काही शाक्त परंपरांमध्ये देवीला मांसाहारी पदार्थांचा नैवेद्यही अर्पण केला जातो. मासा हा बंगाली समाजाच्या दैनंदिन आहाराचा महत्त्वाचा भाग आहे. बंगालच्या सांस्कृतिक परंपरा आणि धार्मिक आचार यांचा जवळचा संबंध असल्याने शाक्त पंथाच्या परंपरांमध्ये मासे हा एक महत्त्वाचा नैवेद्य मानला जातो. उदाहरणार्थ, कालीघाटात कालीमातेला मासे आणि बळी दिलेल्या बकऱ्याचे मांस, या दोन्ही गोष्टी अर्पण केल्या जातात. बंगालमधील सर्वात मोठा सण असलेल्या दुर्गापूजेच्या काळातही अनेक ठिकाणी मांसाहारी पदार्थांचे सेवन केले जाते. येथे या गोष्टीकडे वाईट नजरेने पाहिले जात नाही, उलट ती एक आनंदाची बाब मानली जाते. काही धार्मिक परंपरांमध्ये शाकाहारी आहाराचे नियम आहेत, तर काही परंपरांमध्ये देवतांना मांसाहारी नैवेद्य अर्पण करणे हा धार्मिक विधीचा भाग मानला जातो.

# ट्विंकलिंग स्टार इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला मिळाला वाव; गणपती मूर्ती निर्मिती स्पर्धा उत्साहात

बीड । प्रतिनिधी

**ट्विंकलिंग स्टार इंग्लिश स्कूल, शिवाजीनगर शाखेत बुधवार, दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी गणपती मूर्ती निर्मिती स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.**




विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता, कलात्मक कौशल्य आणि पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रियानी गोरे मॅडम यांना प्रशिक्षक म्हणून शाळेत आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध आकारांच्या आकर्षक व पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलात्मक कौशल्याला चालना मिळण्याबरोबरच गणेशोत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व, पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाली. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचा ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. प्रथम क्रमांक कांचन गोसावी, द्वितीय क्रमांक शुभांगी हाके आणि तृतीय क्रमांक दीप्ती बडे यांनी मिळविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक अश्विनी वळे, स्नेहल माने, दीपिका कदम, स्वाती महाकुंडे, आशा धापसे, सुचिता देवगुडे, मनीषा डापकर आणि उषा गोरे यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी उपमुख्याध्यापक दीपक जहा यांच्या उपस्थितीत विजेत्या पालक व विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सूत्रसंचालन आशा धापसे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी वसुधा वडमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे गणपती मूर्ती निर्मिती स्पर्धा आनंददायी, उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली.

पान १ वरून...

### कर्जमाफीच्या दुसऱ्या यादीत

जमा करण्यात आली आहे. यामध्ये ७ ऑगस्ट रोजी ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांना ५ हजार २८ कोटी ६० लाख रुपये, तर २४ ऑगस्ट रोजी ६ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ५ हजार ८६ कोटी ३० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. दरम्यान, दुसऱ्या यादीतील शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी तपासून नजीकच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'मध्ये जाऊन आधार प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा केली जाणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेली, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीक कर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे केली जात असून, यासाठी महाआयटीची नियुक्ती करण्यात आली आहे. योजनेच्या पोर्टलवर बँकांनी तब्बल ३१ लाख १७ हजार थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. त्यानंतर संगणकीय प्रक्रियेतून निश्चित झालेल्या १६ लाख ९६ हजार पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांमधील काही शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. मात्र, शासनाच्या 'हेअर कट' धोरणानुसार संबंधित कर्जे निरंक करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच योजनेतील पात्र मृत शेतकरी, वयोवृद्ध लाभार्थी आणि बोटांचे ठसे नोंद होत नसलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळावा यासाठी शासनाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली (एसओपी) जारी केली आहे. त्यामुळे अशा लाभार्थ्यांनाही योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी स्वतंत्र प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. दुसऱ्या यादीत नाव असलेल्या प्रत्येक पात्र शेतकऱ्याने विलंब न करता आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरच कर्जमुक्तीची रक्कम संबंधित कर्ज खात्यावर जमा केली जाणार आहे, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले.

-------------

### साखर, मीठ आणि फॅट जास्त

फॅट आणि मीठ यापैकी किमान दोन पोषक घटक निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक असल्यासच पॅकेटच्या पुढील भागावर आरोग्य इशारा देणे आवश्यक ठरणार होते. मात्र, याचिकाकर्त्यांचे वकील राजीव द्विवेदी यांनी या अटीवर आक्षेप घेतला आहे. द्विवेदी यांच्या मते, एखाद्या पॅकेज्ड खाद्यपदार्थामध्ये साखर, मीठ किंवा फॅट यापैकी एकाच घटकाचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक असले तरी पॅकेटच्या पुढील बाजूस आरोग्य इशारा असावा. दोन पोषक घटकांचे प्रमाण वाढलेले असणे बंधनकारक करण्याची अट योग्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, या प्रक्रियेला होत असलेल्या विलंबाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने ऋररअक आणि केंद्र सरकारवर नाराजी व्यक्त केली आहे. लहान मुले आणि सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य कोणत्याही कॉर्पोरेट नफ्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. केंद्र सरकारने आता तीन महिन्यांच्या आत नियमांमध्ये आवश्यक बदल करण्याचे आश्वासन दिले आहे. सुमारे १०० अब्ज डॉलरच्या खाद्यपदार्थ निर्मिती आणि प्रक्रिया उद्योगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रस्तावित नियमांना विरोध केला आहे. कंपन्यांचा मुख्य आक्षेप हा साखर, मीठ आणि फॅटचे प्रमाण मोजण्याच्या पद्धतीवर आहे. आरोग्य इशाऱ्याची मर्यादा ठरवताना प्रत्येक पदार्थातील घटकांचे प्रमाण १०० ग्रॅम किंवा १०० मिलिलिटरच्या आधारावर का ठरवले जात आहे, असा सवाल उद्योगाने उपस्थित केला आहे. कंपन्यांच्या म्हणण्यानुसार, उदाहरणार्थ लोणचे एखादी व्यक्ती १०० ग्रॅम प्रमाणात खात नाही. एका वेळी साधारण ५ ग्रॅम लोणचे खाल्ले जाते. त्यामुळे आरोग्य इशारा ठरवताना १०० ग्रॅमऐवजी प्रत्यक्ष सर्व्हिंग साइज विचारात घेतली पाहिजे, असा त्यांचा युक्तिवाद आहे. दररोज खाल्ल्या जाणाऱ्या पॅकेज्ड खाद्यपदार्थांमध्ये नेमके किती मीठ, साखर आणि फॅट आहे, याची माहिती ग्राहकांना सहज समजणे आवश्यक आहे. सध्या या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम दिशानिर्देशांची प्रतीक्षा आहे.

**नमकीन, भजे, समोसा आणि पापडावरही येणार गंडांतर**

कठोर मर्यादा लागू झाल्यास नमकीन, भुजिया, समोसा आणि पापड यांसारखे पारंपरिक खाद्यपदार्थही लाल आरोग्य इशाऱ्याच्या कक्षेत येऊ शकतात, अशी भीती खाद्य कंपन्यांनी व्यक्त केली आहे. मोठ्या कंपन्यांना त्यांच्या खाद्यपदार्थांचे फॉर्म्युलेशन बदलण्यासाठी संशोधन प्रयोगशाळा आणि इतर संसाधने उपलब्ध असतात. मात्र, लघु उत्पादक आणि कुटीर उद्योगांसाठी अशा प्रकारचे बदल करणे तुलनेने कठीण ठरू शकते, असा उद्योगाचा दावा आहे.

-------------

### सरकारची परवानगी असो वा नसो,

असली तरी मनोज जरांगे यांनी उद्या म्हणजे १२ सप्टेंबर रोजी दुपारी मुंबईला जाण्याचा निर्णय आणि वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. मनोज जरांगे म्हणाले, लोकमान्य टिळकांनी इंग्रजांविरुद्ध उठाव आणि अन्यायाविरुद्ध लोकसमूह एकत्र यावा, त्या लोकसमुहाचे एकत्रित संघटन यावे यासाठी गणेशोत्सव सुरू केला. अन्यायाविरुद्ध एकत्र येऊन चिड आली पाहिजे, म्हणून गणेशोत्सव साजरा केला जातो. त्याच्यामध्ये कसल्याही प्रकारचा मराठ्यांकडून किंवा मुंबईत येणाऱ्या एकाही आंदोलनाकडून कसल्याही प्रकारचे उल्लंघन होणार नाही. हिंदूंच्या सणावारात म्हणजे आमच्या सणावारात कसलंच विघ्न असणार नाही. फक्त विघ्न हे तुम्ही होऊ नये. विघ्नाच्या भूमिकेत तुम्ही उतर नये. तुम्ही जर खरंच छत्रपती शिवाजी महाराजांना आणि हिंदूंना मानणारे असाल तर सरकारने विघ्न बनू नये, हीच आमची अपेक्षा आहे, असे त्यांनी म्हटले. राज्य सरकारने परवानगी दिली किंवा नाही, तरीही आम्ही मुंबईला जाणारच. जोपर्यंत आपण सरकारवर दबाव आणत नाही, तोपर्यंत सरकार काहीच बोलणार नाही. तसेच ज्या मराठा बांधवांना अंतरवाली सराटीला येणे शक्य आहे, त्यांनी शनिवारी होणाऱ्या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मुंबईकडे कूच करताना सरकार किंवा पोलिसांनी आंदोलकांना त्रास दिला, तर मराठा बांधवांनी रस्ते रोखून धरावेत आणि आपापल्या गावांमध्ये निदर्शने करावीत. मुंबईकडे होणारा हा मोर्चा यावेळी खूप मोठा असेल, असेही ते म्हणाले.

----------

### पुढील दोन वर्षांत जालना जिल्ह्यातील

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी मंत्रालयात आयोजित बैठकीत जालना जिल्हा परिषद शाळांच्या विकासकामांचा पुन्हा एकदा आढावा घेतला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यापूर्वीही १ सप्टेंबर रोजीच्या बैठकीत पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा परिषद शाळांचा आढावा घेऊन सूचना केल्या होत्या. त्यावेळी त्यांनी शाळांचा सर्वेकरून अहवाल देण्याचे निर्देश दिले होते. त्यावर चर्चा करून त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. शाळा आणि अंगणवाड्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणारा निधी नियोजनबद्ध, काटेकोर आणि परिणामकारक पद्धतीने खर्च करावा. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याबरोबरच विकासकामांचा दर्जाही उत्तम राखावा. जिल्ह्यातील शाळांचा विकास करताना आदर्श शाळेची संकल्पना डोळ्यासमोर ठेवावी. शाळांची आकर्षक रंगरंगोटी, उत्तम परिसर, आवश्यक पायाभूत सुविधा आणि दर्जेदार कामांवर भर द्यावा. जालना जिल्ह्यात विकसित होणाऱ्या या आदर्श शाळांचे अनुकरण राज्यातील तसेच इतर राज्यांतील शाळांनी करावे, अशा गुणवत्तेचे काम झाले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

-----------

### कोणत्याच राजकीय पक्षांमध्ये

सांगत चव्हाण म्हणाले की, संविधान कितीही चांगले असले, तरी ते अप्रामाणिक लोकांच्या हातात गेल्यास त्यातून चांगले घडणार नाही. त्यामुळे केवळ संविधान चांगले असून उपयोग नाही, तर ते राबवणाऱ्या व्यक्ती आणि संस्थाही प्रामाणिक असणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. पक्षांतराच्या मुद्द्यावर बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी राजीव गांधी यांच्या काळात आणलेल्या पक्षांतर बंदी कायद्याचा संदर्भ दिला. आमदार आणि खासदारांकडून होणाऱ्या पक्षांतराला आळा घालण्याच्या उद्देशाने हा कायदा आणण्यात आला होता. त्यामागे चांगला आणि शुद्ध हेतू होता, असे त्यांनी सांगितले. मात्र, २००३ मध्ये तत्कालीन केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांनी या कायद्यात बदल केला. त्यावेळी जेटली यांनी आपल्याला उद्देशून ''पृथ्वीराज, हमने कानून बदला है, अब अँटी डिफेक्शन नहीं होगा,'' असे म्हटल्याची आठवण चव्हाण यांनी सांगितली. मात्र, कायद्यात बदल केल्यानंतर पक्षांतर थांबण्याऐवजी परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाल्याचे त्यांनी म्हटले. महाराष्ट्रातील शिवसेनेच्या बाबतीत जे घडले, त्यामागे अनेक कारणे सांगितली जातात. मात्र, विद्यमान पक्षांतर बंदी कायदाच प्रभावीपणे काम करत नसल्याचे चव्हाण यांनी सूचित केले. सध्याचा पक्षांतर बंदी कायदा रद्द करून अधिक सोपा आणि प्रभावी कायदा करण्याची मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. ''सध्याचा पक्षांतर बंदी कायदा कचऱ्याच्या टोपलीत टाकला पाहिजे. सोपा कायदा करा. तुम्ही जर पक्षाच्या विरोधात मत केलं, तर तुमचा सगळा अधिकार संपून जाईल,'' अशी भूमिका त्यांनी मांडली. न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोगासारख्या संस्थांवरही त्यांनी गंभीर आरोप केले. देशातील या संस्थांनाही 'कॅप्चर' करण्यात आले असल्याचा दावा करत, ''काही करून निवडणूक जिंका, हाच राजमार्ग ठरला आहे. थानिक स्वराज्य संस्थांच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकांबाबतही पृथ्वीराज चव्हाण यांनी खळबळजनक दावा केला. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांच्या उमेदवारांकडून मतदारांना पैसे वाटण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. ''जिंकण्यासाठी मतदाराला पाच-पाच लाख रुपये दिले,'' असा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील सध्याच्या राजकीय आणि निवडणूक प्रक्रियेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

-------------

### डॉक्टरांना मारहाण आमदार

दिवशी पालघर येथील रिलीफ हॉस्पिटलमध्ये काही शिवसेना कार्यकर्त्यांकडून रुग्णालयातील कर्मचारी आणि डॉक्टरांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेनंतर प्रकरण चांगलेच चर्चेत आले. या प्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात जिल्हाप्रमुख कुंदन संखे, शहरप्रमुख राहुल घरत, रोहित गावित यांच्यासह अनेक जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू होता. रुग्णालयातील मारहाण प्रकरणाची गंभीर दखल घेत शिवसेनेकडून संबंधित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांवर पक्षांतर्गत कारवाई करण्यात आली होती. कुंदन संखे, राहुल घरत आणि रोहित गावित यांच्यासह काही कार्यकर्त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आले होते. रुग्णालयातील कर्मचाऱ्याला मारहाण आणि तोडफोडीच्या आरोपांनंतर ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयानेही गंभीर दखल घेतली होती. आरोपी फरार असल्याच्या मुद्द्यावरून न्यायालयाने पालघर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली होती. एफआयआर दाखल झाल्यानंतर आरोपी फरार कसे होतात, असा सवाल न्यायालयाने पोलिसांना केला होता. तसेच आरोपींना पकडण्यात पोलिसांना अपयश का आले, याबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले होते. पालघर जिल्हा पोलीस अधीक्षकांना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात

### जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, येथे जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्नित असलेल्या जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथे जागतिक






आत्महत्या प्रतिबंध दिन २०२६ निमित्त विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीची जागतिक थीम (आत्महत्येविषयीचा दृष्टिकोन बदला – संवादाला सुरुवात करा) या विषयावर बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी दुपारी २:०० ते ३:०० या वेळेत महाविद्यालयात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक व अतिथी वक्ते म्हणून सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव चे प्रा. संजय बागुल सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.प्रा.बागुल सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, आत्महत्या ही आजच्या काळातील गंभीर समस्या झाली आहे. आपण एकमेकांशी मोकळा संवाद साधला पाहिजे. नैराश्यात असलेल्या व्यक्तीला कसे ओळखावे, तिला मानसिक आधार कसा द्यावा आणि वेळीच तज्ञांची मदत कशी घ्यावी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच शेतकरी बांधव कोणत्या मानसिक दडपणातून जातात, नापिकी, कर्ज आणि कौटुंबिक तणावामुळे ते टोकाचे पाऊल कसे उचलतात याबाबतही त्यांनी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या पालकांना समजून घ्यावे, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधावा आणि कुटुंबात आधाराची भावना निर्माण करावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी फिजिओथेरपी विद्यार्थ्यांना एक महत्त्वाचा संदेश दिला की,तुम्ही फिजिओथेरपिस्ट डॉक्टर आहात. जेव्हा तुम्ही पेशंट हाताळता, तेव्हा तुम्ही त्यांचा सर्वात मोठा आधार असता. तुमच्या एका सकारात्मक बोलण्याने पेशंटचा अर्धा आजार बरा होऊन जातो. त्यामुळे तुमचा संवाद हा उपचाराचा भाग बनवा.

एक छोटासा संवाद सुद्धा एखाद्याचे जीवन वाचवू शकतो असा हृदयस्पर्शी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पॉल राज सर, कार्यालयीन अधीक्षक वाघ सर,डॉ.हरिप्रिया मॅडम,डॉ.सांची चव्हाण,डॉ. मुस्कान शर्मा,डॉ. वीरा,इरफान पठाण सर यांच्यासह सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंमळनेर येथे कुणबी जात प्रमाणपत्रासाठी कागदपत्र दाखल करण्यासाठी शिबिराचे आयोजन

अंमळनेर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील कुणबी मराठा मराठा कुणबी पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र घेण्याच्या अनुषंगाने जलद गतीने कार्यवाही होण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून पाटोदा मंडल स्तरावरील आयोजित या कार्यक्रमात तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या मार्गदर्शनाखाली जात प्रमाणपत्र जात पडताळणी प्रमाणपत्राच्या अनुषंगाने दिनांक १२ सप्टेंबर रोजी अंमळनेर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या मोहिमेत प्राधान्याने मंडळ अधिकारी यांच्याकडून कुणबी नोंदी शोधणे पुराव्याची पडताळणी करणे अर्ज स्वीकारणे व लाभार्थ्यांना प्रमाणपत्राच्या वितरणासाठीची कार्यवाही करणे या बाबींची पूर्तता मंडल अधिकाऱ्यांकडून करण्यात येणार असल्याने अंमळनेर येथील नागरिकांनी आपली कागदपत्रे व पुरावे दाखल करण्यासाठी दि.१२ वार शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे उपस्थित राहण्याचे आवाहन मंडल अधिकारी सुनील तांबारे यांनी केले आहे.

# घरफोडीपासून शेतीपंप, सौरपंपापर्यंत चोरट्यांची नजर

## ‘तक्रार करूनही उपयोग होत नाही’ ; नागरिकांची भावना

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यात घरफोडी, जनावरांची चोरी, आठवडी बाजारातील मोबाईल चोरी, शेतातील विद्युत पंप व केबल तसेच सौरपंप आणि सौरऊर्जा उपकरणांच्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावागावांत चोरीच्या घटना घडत असताना चोरट्यांवर पोलिसांचा पुरेसा धाक आहे का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांसाठी शेतीपंप, केबल तसेच सौरपंप ही केवळ उपकरणे नसून शेतीच्या उत्पादनाशी जोडलेली महत्त्वाची साधने आहेत. या वस्तू चोरीला गेल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. चोरी झाल्यानंतर तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात येणाऱ्या शेतकऱ्याला तातडीने दिलासा मिळण्याऐवजी तपासाच्या नावाखाली केवळ प्रतीक्षा करावी लागत असल्याची भावना काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.**

आष्टी शहरातील आठवडी बाजारात गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरीच्या तक्रारीही होत आहेत. बसस्थानक परिसरातही चोरीच्या घटना रोखण्यासाठी नियमित गस्त आणि प्रभावी पोलिसी नजर असणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. चोरी झाल्यानंतर तक्रार दाखल करणे, घटनास्थळाची पाहणी, सीसीटीव्ही फुटेज तपासणे, संशयितांचा शोध घेणे आणि चोरीचा मुद्देमाल परत मिळवणे ही तपासाची महत्त्वाची प्रक्रिया आहे. मात्र, या प्रक्रियेला अपेक्षित वेग मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. ‘तक्रार केल्यानंतर पुढे काय झाले?’ ‘आरोपी सापडला का?’ आणि ‘चोरीचा मुद्देमाल परत मिळणार तरी कधी?’ या प्रश्नांची उत्तरे अनेकांना मिळत नसल्याची भावना आहे.

**मुद्देमाल जप्त असेल तर रिकव्हरी कुठे?**

एखाद्या चोरीच्या प्रकरणात संशयित किंवा आरोपी पोलिसांच्या ताब्यात आल्यानंतर त्याच्याकडून मुद्देमालाची पूर्णपणे रिकव्हरी झाली का, याबाबतही स्पष्टता असणे गरजेचे आहे. आरोपी पकडला, प्रकरण पुढे गेले; मात्र प्रत्यक्ष चोरी गेलेला माल संबंधित तक्रारदाराला परत मिळाला का, हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे केवळ आरोपी पकडण्यापेक्षा चोरीचा मुद्देमाल शोधून तक्रारदाराच्या स्वाधीन करण्याच्या कारवाईवरही नागरिकांचे लक्ष आहे.

**‘तक्रार करूनही उपयोग काय?’ अशी भावना गंभीर**

कायदा–सुव्यवस्था राखण्यासोबतच नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. चोरीच्या घटनांनंतर अपेक्षित कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत असेल, तर ती निश्चितच गंभीर बाब आहे. ‘चोरी झाली तर पोलिसांत तक्रार करूनही काय फायदा?’ अशी भावना निर्माण होऊ नये, यासाठी प्रत्येक तक्रारीचा तपास, त्याची प्रगती आणि झालेली कारवाई याबाबत पारदर्शकता आवश्यक आहे.

**‘लागेबांधे आहेत का?’ चर्चांना उधाण**

चोरीच्या काही प्रकरणांमध्ये आरोपी सापडल्यानंतरही चोरीचा संपूर्ण मुद्देमाल परत मिळत नसल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू आहेत. काही प्रकरणांमध्ये आरोपींना कोणाचे पाठबळ आहे का? तपासाच्या प्रक्रियेत काही प्रकारचे संगनमत किंवा तडजोड होते का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या चर्चांमध्ये तथ्य आहे की केवळ अफवा, हे पोलिसांच्या निष्पक्ष तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**‘प्रकरण कोणतेही असो, सेटलमेंट?’ नागरिकांचा सवाल**

आष्टी पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीबाबतही नागरिकांमध्ये नाराजीची चर्चा आहे. एखादे प्रकरण घडल्यानंतर त्याचा कायदेशीर पद्धतीने तपास करून दोषींवर कारवाई होण्याऐवजी तडजोडीचा मार्ग स्वीकारला जातो का, असा सवाल काही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आष्टी हे बीड जिल्ह्याच्या सीमेवरील महत्त्वाचे ठिकाण असून तालुक्यातील मोठ्या भौगोलिक क्षेत्रामुळे पोलिसांवरही मोठी जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी गस्त, सीसीटीव्हीचा वापर, गुन्हेगारांची माहिती संकलित करणे आणि प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या मनातील संशय आणि चर्चांना पूर्णविराम देण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे पारदर्शक आणि ठोस पोलीस कारवाई. त्यामुळे आष्टी पोलिसांकडून चोरीच्या प्रकरणांमध्ये आतापर्यंत नेमकी किती कारवाई झाली, किती आरोपी पकडले, किती मुद्देमाल जप्त केला आणि प्रत्यक्षात किती मुद्देमाल तक्रारदारांना परत मिळवून दिला, याची माहिती सार्वजनिक होणार का? हा प्रश्न आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

## अनिषा ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे फुटबॉल, बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत घवघवीत यश

आष्टी : अनिषा ग्लोबल स्कूल, आष्टीच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय फुटबॉल, बॅडमिंटन आणि बुद्धिबळ स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

हंबर्डे कॉलेज, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत अनिषा ग्लोबल स्कूलच्या संघाने शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. विजयी संघात अनघ मोहळकर, हर्षवर्धन काळे, कनिफनाथ मिसाळ, शंभू ओव्हाळ, अनुष पवार, प्रसाद साऊणे, साई खुळपे, श्रीराज मुरकुटे, अर्णव नवसरे, अथर्व ओमासे, अथर्व गायकवाड, विश्वजीत जगताप, सोहम संगाळे, अबान शेख, श्रीराम खेंगारे आणि यशराज शिंदे यांचा समावेश आहे.

तसेच कडा ग्रामपंचायत बॅडमिंटन हॉल, कडा येथे झालेल्या तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत अनिषा ग्लोबल स्कूलच्या मुली आणि मुलांच्या संघांनी विजेतेपद मिळविले. विजेत्या मुलींच्या संघात अनुष्का घोडके, स्वरा वराट, अनुष्का कांबळे आणि अनुष्का काळे यांचा समावेश होता. तर विजेत्या मुलांच्या संघात हर्षवर्धन




काळे, अनघ मोहळकर, चैतन्य दहिकर, सिद्धार्थ कोठारी आणि शंभू ओव्हाळ यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

पिंपळेश्वर इंग्लिश स्कूल, आष्टी येथे आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतही अनिषा ग्लोबल स्कूलच्या मुली आणि मुलांच्या संघांनी विजेतेपद पटकावले. विजेत्या मुलींच्या संघात पलक चोपडा, अनुष्का कांबळे, अनुष्का काळे आणि तेजस्विनी शिंदे यांचा समावेश होता. तर विजेत्या मुलांच्या संघात अनघ मोहळकर, आदेश पडोळे, मोहम्मद फाज खान, सक्षम टेकाळे आणि विराज पितळे यांनी विजय मिळविला. या सर्व विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी दाखवलेली मेहनत, शिस्त, संघभावना, चिकाटी आणि क्रीडाभावना यामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक श्री. अजीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल श्री. पिंपळेश्वर महादेव देवस्थानचे अध्यक्ष श्री. सुरेश (अण्णा) धस, शाळेच्या कार्यकारी संचालिका सौ. प्राजक्ता धस, प्राचार्य श्री. अविनाश राऊत व कु. हरजोतकौर जोगी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. जिल्हास्तरावरही विद्यार्थी उत्तम कामगिरी करून अनिषा ग्लोबल स्कूल आणि आष्टीचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

## पान ६ वरुन...

### आक्रोश मोर्चानेच

तालुक्यातील सर्व शाळेतील विद्यार्थी शिक्षक वर्ग सुज्ञ नागरिक व डोंगरकिन्ही, नाळवंडी, पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोर्चाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना सय्यद सज्जाद यांनी केले.एका लहान चिमुकली वरील अत्याचार हा प्रशासनाची मान शेणमेने खाली घालायला लावणार आहे. या अगोदरही अशा घटनेबद्दल तक्रारी करण्यात आल्या होत्या परंतु प्रशासनाने कसलीच दखल न घेतल्यामुळे ही घटना घडल्याचं नागरिकांमधून रोष व्यक्त होताना दिसला. दारू गांजा इत्यादी व्यावसाय करणारा नराधम कृत्य करत आहे मग ते व्यावसाय करणारा नराधम आणि त्याला पाठीशी घालणारे प्रशासन हे दोन्ही तितकेच जबाबदार आहेत अशा भावना येणाऱ्या नागरिकांमधून व्यक्त होत होत्या एकूणच या अत्याचारामुळे प्रशासनाची मान खाली गेली आहे हे मात्र नक्की.चिमुकली वरील अत्याचाराविरुद्ध रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानच्या माध्यमातून बाळा बांगर यांनी घेतलेली आक्रमक भूमिका आणि विचारलेले प्रश्न हे काळजाला भिडणारे होते. काळा बांगर च्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाकडे नव्हती त्यामुळे प्रशासनाची ततमम झाल्याचे पाहायला मिळाले. येणाऱ्या काळात महिलांच्या संरक्षणासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानच्या माध्यमातून आक्रमक भूमिका घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करत राहणार असल्याचे देखील प्रतिष्ठानच्या वतीने जाहीर करण्यात आले.

जन आक्रोश मूक मोर्चातून लहान चिमुकल्यांनी व्यक्त केलेल्या भावना या काळजाला भिडणारे होत्या. त्या नराधमारा फाशी द्या.त्या चिमुकलीला न्याय द्या.. प्रशासना आता तरी जागा हो त्या चिमुकलीच्या न्यायाचा धागा हो असं म्हणत... शाळेच्या विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या. भावना जरी तीव्र असल्या तरी प्रशासन मात्र गेंड्याच्या कातडी सारखं निबर गट्ट झाल्याचे दिसून आलं. या शब्दातून कुठे आधार दिसलाच नाही कुठे भावना दिसल्याच नाहीत. बघतो करतो असे शब्द ऐकून उपस्थितांची रागाची तीव्रता वाढत चालली होती.. एकूणच प्रशासनचं त्यांना पाठबळ देते की काय? असा प्रश्न उपस्थित झाल्याचे दिसून आलं.

### चुकीच्या माहितीच्या

पदोन्नतीची कारवाई करण्यासाठी तब्बल सोळा वर्षे लागले. सोळा वर्षांनी पुन्हा कनिष्ठ सहाय्यक पदावर माझी नियुक्ती करण्यात आली. सदर पदावर १९ मार्च २०१९ पासून मी कार्यरत आहे. मात्र माझी नियुक्ती ४– ९– २००६ पासून ग्राह्य धरण्यात येऊन मला पदोन्नतीच्या अंतर्गत लाभ देण्यात यावेत. अशी मागणी ज्ञानेश्वर सुधाकर कुलकर्णी यांनी ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे अपिलाद्वारे केली आहे.

### कानडी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या

घटकांना सोबत घेऊन काम करण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य, आजी–माजी सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बिनविरोध निवडीच्या निमित्ताने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### बैलपोळा मिरवणुकीत डीजे

बसवणाऱ्या आवाजात डीजे वाजवला जात होता.

पोलिसांनी तत्काळ सदर डीजे वाहन ताब्यात घेतले. या प्रकरणी डीजे चालक सखाराम नामदेव कांबळे (वय २७, रा. शेकटा, ता. गेवराई), डीजे मालक जगन अविनाश फुलारे (रा. जायकवाडी वसाहत, ता. गेवराई) आणि मिरवणूक मंडळाचे सदस्य दत्ता दगडू गव्हाणे (रा. बेलगाव, ता. गेवराई) या तिघांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय, वाहनाच्या मूळ संरचनेत बेकायदेशीर बदल केल्याप्रकरणी कायदेशीर दंड आकारणीसाठी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (), बीड यांनाही पत्र पाठवण्यात आले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस हवालदार चंद्रसेन माळी (ब.नं. १३१७), पोलीस कॉन्स्टेबल नारायण सरवदे (ब.नं. ८४९) व पोलीस कॉन्स्टेबल अनिकेत खेडकर (ब.नं. १६३) यांच्या पथकाने केली. आगामी सणासुदीच्या काळात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अशीच कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### बीड जिल्ह्यात तात्काळ

२०२६ गुरुवार रोजी हे निवेदन देण्यात आले असून यावेळी जेष्ठ नेते दयानंद स्वामी,कचरु तात्या खळगे, महावीर मस्के,धम्मानंद साळवे,अंकुशराव जाधव,ऑड नारायण गोले पाटील,मनोहर डाके,ऑड सय्यद याकुब,ऑड आमोल डोंगरे,नावनाथ धायजे, सचिन उजगरे,शेख बाबा,भारत सावंत,महेमुद पटेल यांच्यासह सर्व पक्षीय पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### राष्ट्रीय गणेश मंडळाच्या

हारके, उत्सव यशस्वीतेसाठी विविध समित्यांची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये ढोलपथक प्रमुख महादेव कैवाडे, सार्थक भुताड, ज्ञानेश्वर निर्मळ, पियुष पुरोहित लेझीम पथक प्रमुख म्हणून बंडू कैवाडे, अविनाश इगडे, सजावट प्रमुख राम कदम, धायगुडे सर, प्रविण भागवत, राजकुमार हिरापुरे, अक्षय इगडे प्रसिद्धी प्रमुख म्हणून राहुल तपकाळ, सिद्धार्थ टेंगळे, अभिषेक पिरोजी, देखावा समिती अशोक घोडके, महेश इगडे, सुशील महालिंगे, वैभव देशमुख, वर्गणी समिती मिलिंद महाजन, नितीन इगडे, अशोक लड्डा, शैलेश मुसळे, उद्धव जाधव, गणेश पाचेंगावकर, राम इगडे जाहिरात प्रमुख म्हणून भीमा शिंदे, शक्ती इगडे यांची निवड करण्यात आली. सल्लागार समितीमध्ये सतीश आप्पा हारके, दिलीप सारडा, महेंद्र सारडा, विजय मंगीराज, विजय देशमुख, डॉ. आदित्य सारडा, नितीन इगडे, राहुल मुंगळे, बंडू एरंडे, सचिन मुसळे, नितीन सारडा, प्रभाकर शिंदे, डॉ. पंकज सहस्त्रबुद्धे, रवी पायगुडे, प्रमोद देशमुख, अरुणराव नवले, बाळू सारडा, संतोष सपकाळ, तेजस महाजन, अनिल मुसळे, ऋषी शेंडगे, तुषार दळवी, अभिषेक सारडा, बंटी जाधव, सुभाष सपकाळ, सागर सपकाळ आदींचा समावेश आहे. यंदाचे ६३ वे वर्ष अधिक दिमाखात आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात यंदाचा गणेश उत्सव साजरा करण्याचा संकल्प नूतन कार्यकारिणीने केला आहे.

## श्रावण महिन्यातील चौथ्या सोमवारी जांब येथील महादेव मंदिरात भव्य रक्तदान शिबिर संपन्न

आर्वी । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील जांब येथे नवसाला पावणारा कैलासनाथ महादेव अशी आख्यायिका असलेले महादेवाचे मंदिर आहे. येथे साला बादा प्रमाणे श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी भव्य दिव्य प्रमाणात महादेव मंदिरात यात्रा भरते .




जांब व त्या परिसरातील अनेक भाविक भक्त मोठ्या प्रमाणात दर्शन घेतात . जांब येथे अतिशय पौराणिक व हेमाडपंथी असं महादेवाचे मंदिर असून श्रावण महिन्यात दर्शनासाठी परिसरातील लोकांची खूप मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी असते .या महादेवाचे वैशिष्ट्य असं आहे की लोकांच्या बोलण्या व दंतकथेनुसार या ठिकाणी नवसाला पावणारा महादेव अशी ख्याती असलेले व पौराणिक महत्व असलेले मंदिर आहे.

हे मंदिर व त्याची स्थापना केव्हापासून आहे ते कोणालाही ज्ञात नाहीये श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिर, ग्राम स्वच्छता ,महाप्रसादाचे वाटप व लोकप्रबोधन व आरोग्य सेवा वेगवेगळ्या माध्यमातून केली जाते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ७ सप्टेंबर सोमवारी २०२६ रोजी श्रावणातील चौथ्या सोमवारी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलं होतं या रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठदान आहे याची प्रचिती या निमित्ताने पाहायला मिळाली या कार्यक्रमासाठी गावचे सरपंच अभिजीत खाडे, पोलीस पाटील प्रतीक सातपुते ,डॉ.संजय पिंपळे, डॉ.वसंत गायके, सामाजिक कार्यकर्ते विकी आण्णा पाचंग्रे , प्रल्हाद नागरगोजे, सुनील पव्हणे, बळीराम सातपुते, वैजनाथ तांबारे(फौजी ) तुकाराम तांबारे, भरत सातपुते, परमेश्वर सातपुते, सचिन ढोबळे, नितीन ढोबळे, अरुण माळी, भारत कोल्हे, शुभम नागरगोजे, ग्रामसेवक अनिल बडे साहेब, महिला सेवक व रक्तदाते अयोध्या सातपुते, अश्विनी नागरगोजे, तांबारे ताई,वैभव देवा मुळे, पुजारी परमेश्वर सातपुते व धनाजी बाबा मित्र मंडळाचे सर्व सदस्य व कार्यकर्ते यांनी या रक्तदान उपक्रमात स्वयंस्पर्तीने सहभाग नोंदवला. त्याबद्दल सर्व समाज बांधव व सदस्यांचे डॉ. सुरेश पिंपळे यांनी आभार मानले.

## संतांची व भगवंताची सेवा निरपेक्ष भावाने करावी –ह.भ.प. महादेव महाराज राऊत



बीड । प्रतिनिधी

गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे नवनाथ ग्रंथ सांगता व कर निम्मित महादेव महाराज राऊत यांचे सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली महादेव महाराज कीर्तनात पुढे म्हणाले की ‘‘मनुष्याने साधुसंतांची सेवा निरपेक्ष भावाने करावे. साधुसंत व भगवंत हे निरपेक्ष सेवा केल्यावर सेवेचे फळ निश्चितच देतात पण काही अपेक्षा ठेवून सेवा करणे हे साधू पासून लपत नाही म्हणून साधुसंतांची सेवा व भगवंताची सेवा ही निरपेक्ष भावाने करावी असे ह भ प महादेव महाराज राऊत अभंग विवेचनांमध्ये म्हणाले

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे प्रतिवर्षीप्रमाणे श्रावण महिन्यामध्ये नवनाथ ग्रंथाचे पारायण होते नवनाथ ग्रंथ पारायणाची सांगता पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी करी दिवशी काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाच्या महापंगतीने होते.

राऊत महाराज पुढे म्हणाले की, गोरक्षनाथ टेकडी येथे निरपेक्ष रूपाने गोरक्षनाथाची सेवा करावी टेकडीवर सेवा करताना कसलीही अपेक्षा ठेवू नये निरपेक्ष सेवा केली की भगवंत व साधुसंत फळ देतात त्याप्रमाणे गोरक्षनाथ टेकडीवर सेवा करताना निरपेक्ष भावाने सेवा करावी असे महादेव महाराज राऊत अभंग विवेचनात म्हणाले यावेळी भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होती टाळकरी माळकरी भजनी मंडळी गायनाचार्य वादंगाचार्य मृदंगाचार्य यांच्यासह भाविक भक्तांच्या प्रचंड गर्दीमध्ये नवनाथ ग्रंथ सांगता व पोळ्याची कर कार्यक्रम संपन्न झाला. श्रीराम भक्त विष्णुदास महाराज सुरवसे यांनी महादेव महाराज राऊत व गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांना भावार्थरामायनाच्या प्रती भेट दिली

महाप्रसादाच्या महापंगतीने सांगता

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे श्रावण महिन्यामध्ये नवनाथ ग्रंथ पारायण होते या पारायणाची सांगता काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाच्या महापंगतीने संपन्न झाली.

# जिव्हाळा बेघर निवारासाठी नगरपरिषद सी.ओ. समवेत बीड शहर बचाव मंचाची बैठक

### कृष्णाई नगर, आगलावे इस्टेट भागातील पिण्याच्या पाण्याचा व पथदिव्यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची मागणी

### माने कॉम्प्लेक्स समोरील चौकाला महात्मा गांधी चौक व रस्त्याला महात्मा गांधी मार्ग नाव देण्याची आग्रही मागणी

बीड । प्रतिनिधी

दि. ९/०९ : बीड शहरातील नवी भाजी मंडई भागातील सातत्याने कार्यरत असलेल्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्रासाठी शासन निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी यांची भेट घेऊन बैठक केली. या बैठकीमध्ये शासनाच्या जीआर सह निवेदन सादर करण्यात आले. जिव्हाळा बेघर निवारा केंद्राला अद्यापही शासन निधी मिळत नसल्याचे यातून निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच शासन निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेकडून कसल्याही प्रकारची मदत कार्य उपाययोजना मिळत नसल्याचेही सांगण्यात आले. आपल्या नगर परिषदे तर्फे कसल्याही सोयी सुविधा व गरजे नुसार मदत कार्य तिथे केल्या जात नाही हे पण निदर्शनास आणून देण्यात आले. यावर मुख्याधिकारी साहेबांनी सकारात्मकतेने सविस्तर पणे परिस्थितीचा



आढावा घेत योग्य ती चर्चा करून मार्गदर्शन केले. बेघर निवारा केंद्रासाठी नगरपरिषदे कडून निधी उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने आमसभे मध्ये ठराव मांडण्यात येईल यासाठी तात्काळ कार्यवाहीला सुरुवात केली आहे. तसेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील सद्य परिस्थितीतील सर्व समस्यांची यादी करून घेतली आहे. अशा पद्धतीने मुख्याधिकारी विवेक मांडुरके साहेब यांनी सकारात्मकपणे सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना करण्यासाठी आश्वासित केले आहे.

याच बैठकीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये बीड शहर बचाव मंच शिष्टमंडळाच्या वतीने अंकुश नगरला जोडलेल्या भागातील कृष्णाई नगर, आगलावे इस्टेट या सर्व परिसरामधील पिण्याच्या पाण्याची टंचाई तसेच पाईपलाईन दुरुस्ती, नळ कनेक्शन दुरुस्त्या तसेच योग्य दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याचे प्रश्न मांडण्यात आले. या भागांमध्ये पथदिवे अद्यापही लावण्यात आलेले नाहीत हेही निदर्शनास आणून दिले. पथदिव्यां अभावी अंधारामुळे नागरिकांची सातत्याने होत असलेली गैरसोय निदर्शनास आणून देण्यात आली. तसेच या संदर्भातील सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. यासंदर्भातील पुढील कार्यवाहीसाठी मुख्याधिकारी यांनी उपस्थितांना आश्वासित केले आहे. बैठकीच्या तिसऱ्या टप्प्यांमध्ये बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाच्या वतीने 'माने कॉम्प्लेक्स' समोरील चौकाला महात्मा गांधी चौक असे नाव देण्यात यावे व या मार्गांना महात्मा गांधी मार्ग असे नाव देण्यात यावे अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. या संदर्भातील सविस्तर निवेदन मुख्याधिकारी यांना सादर करण्यात आले आहे. या सर्व प्रश्नांसाठी तसेच मागण्यांसाठी दिलेल्या निवेदनांवर योग्य ती कार्यवाही करून उपयोजना केल्या जातील असे सकारात्मकपणे आश्वासित केले आहे. यावेळी शिष्टमंडळामध्ये बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, प्राचार्य कॉ. डी.जी तांदळे , डॉ. संजय तांदळे, पाशाभाई शेख, बाजीराव ढाकणे, जिव्हाळाचे राजू वंजारे, अभिजीत वैद्य आदी सर्वांची प्रमुख उपस्थिती होती.

# साखरेच्या दरवाढीचा कारखान्यांना फायदा नाही, ऊस दरावर तोडगा काढू- मंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर / प्रतिनिधी

२०२६-२७: यंदाचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयाला शेतकरी संघटनांनी विरोध दर्शवला आहे. तसेच साखरेच्या वाढत्या दराच्या पार्श्वभूमीवर उसालाही वाढीव दर देण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याचे संस्थापक हसन मुश्रीफ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. साखरेच्या दरवाढीचा कारखान्यांना फायदा झालेला नाही. यंदा ऊस दरावर चर्चा करून तोडगा काढू, असा आश्वासन त्यांनी दिले आहे.

ते कोल्हापुरात पत्रकारांशी बोलत होते. गेल्या वर्षी उसाला प्रतिटनाला ३,४०० रुपये दर दिला होता. १०० रुपये द्यायचे राहिले होते. अनेक कारखाने ते देत आहेत. साखरेचा दर कृत्रिमरित्या वाढला होता. दोन दिवसांसाठी दर वाढला आणि तो आता कमी आला आहे. त्यामुळे साखरेच्या दरावर ऊस दर मागत असतील तर त्यांच्याशी चर्चा करावी लागेल. कारखान्यांना त्याचा फायदा झालेला नाही. योग्य एफआरपी कारखाने देत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात एक रुपयाची थकबाकी राहिलेली नाही, असे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले. राज्यामध्ये साखर टंचाई निर्माण झाली.




सणासुदीचे दिवस आहेत. साखरेचा दर किलोमागे ६०, ७० रुपयांवर पोहोचल्यानंतर सरकारला हे पाऊल उचलावे लागले. शेतकरी संघटनांशी चर्चा करावी लागेल. याबाबत त्यांना शासनाची भूमिका सांगितल्यानंतर त्यावर निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरु करण्याचा राज्य सरकारचा निर्णय चुकीचा असल्याची भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतली आहे.

यामुळे एफआरपीत घट होऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होईल. त्यासाठी राज्य सरकारने शेतकऱ्यांना टनामागे ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी स्वाभिमानीचे नेते राजू शेट्टी यांनी केली आहे. यामुळे यंदा ऊस दरावरुन संघर्ष होण्याची शक्यता आहे. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीबाबतही त्यांनी भाष्य केले आहे. ही निवडणूक आम्ही महायुतीमार्फत लढणार आहोत. आता चित्र स्पष्ट होईल.

आम्ही सामंजस्याने मार्ग काढू, असे मुश्रीफ यांनी म्हटले आहे. राज्यामध्ये भाजप मोठा भाऊ आहे. पण गोकुळच्या सदस्यांमध्ये राष्ट्रवादी हा मोठा भाऊ आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आम्ही सर्व सांगितलेले आहे. जागावाटपाचा तिढा व्यवस्थित सुटेल, तेच यातून मार्ग काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## चारा छावण्या सुरू करा-पडळकर




सांगली: जत तालुक्यात एकही पाऊस झालेला नाही. तलावांत १० टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा नाही. तालुक्यात दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तालुक्यात चारा छावण्यांऐवजी चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी करणार असल्याचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सांगितले.

सांगलीत माध्यमांशी आमदार पडळकर यांनी संवाद साधला. जत तालुक्यात म्हैसाळ योजनेचे पाणी पोहोचत नसल्याबद्दल ते म्हणाले, ''योजनेच्या मोटारी खराब झाल्या आहेत. त्या पूर्ण क्षमतेने चालत नाहीत. त्यासाठी नवीन मोटारींची मागणी केली आहे. विशेष बाब म्हणून 'जलसंपदा'ने ३५ लाख रुपये मंजूर केले आहेत. सध्या जतसाठी म्हैसाळ योजनेतून ३८० क्युसेकने पाणी सुरू आहे.'' यंदाच्या पावसाळ्यात जत तालुक्यात पाऊस झालेला नाही. तालुक्यातील सर्व तलावांत १० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा आहे. त्यामुळे तालुक्यात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यात चारा छावण्या सुरू करण्यापेक्षा चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे पडळकर यांनी सांगितले. सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील शिपाई भरती पैसे घेऊन झाल्याचा आरोप आमदार सदाभाऊ खोत व आमदार गोपीचंद पडळकर यांनी केला. या भरतीत महाघोटाळा झाल्याचा आरोपही त्यांनी केला. आमदार खोत म्हणाले, ''बँकेचे अध्यक्ष आणि त्यांचे पाठीराखे यांनी जागा वाटून घेतल्या आहेत. या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका काढताना पारदर्शकता नव्हती. कुठे पेपर घेतले, कुठे नेऊन ठेवले, याला धरबंध राहिलेला नाही. पैसे घेऊन लोक भरलेले आहेत. त्याच्या चौकशीची मागणी आम्ही सहकारमंत्री, मुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत.''पडळकर म्हणाले, ''जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या घोटाळ्यावर आमदार रोहित पवार का बोलत नाहीत? शिपाई भरतीचा पेपर झाला. कुठे आहेत उत्तरपत्रिकेच्या कार्बन कॉपी? ती दिलीच नाही. त्यांना घोटाळा करायचा आहे.''

## शेत पाणंद रस्त्याची लांबी आणि गुणवत्तेवर परिणाम,राज्य शासनाने घेतला महत्वाचा निर्णय

रस्त्याच्या कामासाठी यंत्रांच्या तासांची ठरवून दिलेली मर्यादा आणि प्रत्यक्ष कामासाठी लागणारा वेळ यामध्ये तफावत निर्माण होत आहे. मधील गृहीत कार्यक्षमता प्रत्यक्ष क्षेत्रातील कामाशी सुसंगत नसल्याने आवश्यक तासांपेक्षा कमी तास मंजूर होत असून, त्याचा थेट परिणाम रस्त्याची गुणवत्ता आणि कामाच्या लांबीवर होत असल्याचे समोर आले आहे. यामुळे मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेबाबत एक नवीन शासन निर्णय घेण्यात आला आहे.

मशीन आऊटफुटची अंमलबजावणी : मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत रस्ते कामासाठी लागणारी यंत्रसामग्री (उदा. एक्सकेव्हीटर/जेसीबी) एका तासात किती घनमीटर खोदाईचे काम करेल,



याचे परिमाण हे प्रामुख्याने संबंधित भूस्तराच्या प्रकारावर अवलंबून असते. भौगोलिकदृष्ट्या एकाच प्रकारच्या भूस्तरासाठी मशिनरीची कार्यक्षमता संपूर्ण राज्यात सारखीच राहणे अपेक्षित असले, तरी प्रत्यक्षात स्थानिक पातळीवर भूस्तराची एकसमानता आढळून येत नाही. यास्तव, भौगोलिक विविधतेचा विचार करून, संबंधित कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांनी संबधित जिल्ह्यातील भूस्तराची स्थानिक पाहणी करावी. त्यानुसार मशिनरीचे परिमाण निश्चित करून देण्यात यावे. या योजनेंतर्गत करावयाचे रस्ते हे मुरुमीकरणापर्यंत करणे अभिप्रेत असून त्याकरीता रु.१५ लाख प्रती कि.मी. अशी मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. सबब, शेत/पाणंद रत्यांची कामे रु.१५ लाख एवढ्या मर्यादेमध्येच करण्याची दक्षता घेण्यात यावी.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी / ऑनलाइन प्रणालीमध्ये संबंधित कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांच्याकडून मशिनरी आउटफूट फॅक्टर प्राप्त करुन समाविष्ट करून प्रणाली तातडीने अद्ययावत करण्यात यावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे वेबपोर्टलमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही तात्काळ करावी, असेही या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## पावसाळ्यात जनावरांचा गोठा सुस्थितीत ठेवण्यासाठी करा 'या' गोष्टींचा अवलंब!

सध्या पावसाळ्याचे दिवस असून जनावरांसाठी योग्य निवाऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक असते. यासाठी घराला लागून जनावरांचा गोठा सुस्थितीत करून घेतला जातो. कुठे पाणी गळतंय का? जमिनीवर मुरूम टाकून सपाट करणे असो, ही कामे केली जातात. जनावरांचा गोठा व्यवस्थापनाचा दूध उत्पादनावर सुद्धा परिणाम होतो. जनावरांना पावसाळ्यात सुरक्षित आणि उबदार जागा मिळणे गरजेचे आहे.



गोठ्याचे व्यवस्थापन खालीलप्रमाणे करा : गोठ्यामध्ये पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनिया मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा असावा. गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था करावी, त्यांना बसण्यासाठी आरामदायी व उबदार जागा असावी. शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे. पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते त्यामुळे वेळोवेळी जमीन कोरडी होईल याची काळजी घ्यावी. दगड व माती खुरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खुरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो.हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत.

शेळीच्या गोठ्याचे व्यवस्थापन : पावसाळ्यामध्ये पश्चिमेकडून पाऊस व वारा वाहतो, त्यानुसार शेळ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी गोठ्यात आवश्यक त्या उपाययोजना कराव्या. शेळ्यांना ठेवण्यासाठी वेगवेगळी दालने असावी ज्यामुळे आजारी शेळ्या, पिले, गाभण शेळ्या व बोकड वेगवेगळे ठेवता येतील. शेळ्यांना आवश्यक तेवढी जागा द्यावी, जेणेकरून गर्दी होणार नाही. पावसाळ्यात शेळ्यांच्या शेडच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकावा, तसेच शेडमधील जमिनीवरही चुना भुरभुरावा.

## कमी खर्चात आणि कमी दिवसांत हमखास नफा देणारे पीक - मटार!

मटार लागवड हा कमी कालावधीत आणि कमी खर्चात शेतकऱ्यांना हमखास नफा मिळवून देणारा एक उत्तम कोरडवाहू व बागायती व्यवसाय आहे. मटारच्या पिका मुळे जमिनीचा सुपीकपणा (नत्र स्थिरीकरण) वाढण्यासही मदत होते. मटारची यशस्वी लागवड करण्यासाठी खालील माहिती उपयुक्त ठरेल हवामान आणि जमीन : मटार हे प्रामुख्याने थंड आणि कोरड्या हवामानातील पीक आहे. बियांच्या उगवणीसाठी २२ आणि पिकाच्या उत्तम वाढीसाठी १५ ते १८ तापमान आदर्श मानले जाते. जास्त उष्णतेमुळे फुलगळ होते. मध्यम ते भारी, उत्तम निचरा होणारी आणि सुपीक जमीन योग्य ठरते. जमिनीचा सामू ६ ते ७.५ च्या दरम्यान असावा. लागवडीचा हंगाम : रब्बी हंगाम (सर्वोत्तम): १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर हा काळ मटार लागवडीसाठी अत्यंत योग्य आहे. डोंगराळ किंवा कमी तापमानाच्या भागात जून-जुलैमध्येही लागवड केली जाते.

सुधारित जाती :लवकर येणाऱ्या जाती (६० दिवसांत): असौजी, अर्केल (), मटार अगेता. मध्यम कालावधीत येणाऱ्या जाती (७५-८०



दिवसांत): बोनव्हिला, जवाहर मटार-१, आझाद मटार-१.

लागवड पद्धत : जमीन १-२ वेळा चांगली नांगरून भुसभुशीत करावी. हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. लवकर येणाऱ्या जातींसाठी हेक्टरी ८० ते १०० किलो आणि उशिरा येणाऱ्या जातींसाठी ६० ते ७० किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाणास रायझोबियम (२५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे) आणि बुरशीनाशकाची प्रक्रिया नक्की करावी. दोन ओळीत ३० सेमी आणि दोन रोपांत ५ ते १० सेमी अंतर ठेवून सपाट वाफ्यात किंवा सरी-वरंब्यावर पेरणी करावी. खत आणि पाणी व्यवस्थापन : मटार हे शेंगावर्गीय पीक असल्याने याला नत्राची गरज कमी असते. पेरणीच्या वेळी २० ते ३० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. पेरणीनंतर लगेच पहिले हलके पाणी द्यावे. त्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. फुलकळ्या निघताना आणि शेंगा भरताना पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. काढणी आणि उत्पादन : काढणी: शेंगांचा रंग गडद हिरवा असताना आणि दाणे मऊ व पूर्ण भरलेले असतानाच हाताने तोडणी करावी. शेंगा जास्त जून झाल्यास चव खराब होते. हिरव्या शेंगांचे सरासरी उत्पादन प्रति हेक्टरी ७ ते १० टन मिळते.।

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६६ : आग्र्याहून सुटका झाल्यानंतर शिवाजीमहाराज राजगड येथे सुखरुप पोहोचले.
१७८६ : ब्रिटीश इस्ट इंडियाचे अधिकारी लॉर्ड कॉर्नवॉलिस हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले.
१८५७ : कॅलिफोर्निया गोल्ड रश मध्ये सापडलेले १३-१५ टन सोने घेऊन जाणारे एस.एस. सेंट्रल अमेरिका हे जहाज सोने व ४२६ प्रवाशांसह बुडाले.
१८७३ : टाइपराइटर पहिल्यांदा ग्राहकांना विकण्यात आले.
१९१९ : अ‍ॅडॉल्फ हिटलर यांनी जर्मन वर्कर्स पार्टी मध्ये प्रवेश केला.
१९३० : विल्फ्रेड होंड्स यांनी आपला शेवटचा म्हणजे १११० वा प्रथमश्रेणी क्रिकेट सामना खेळला.
१९४८ : भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानच्या हद्दीत शिरले. जुलुमी रझाकारांच्या मदतीने स्वतंत्र राहण्याचा निजामाचा हट्ट मोडून या फौजांनी हैदराबाद ताब्यात घेतले. हैदराबाद मुक्तीच्या या कारवाईचे वर्णन 'पोलिस अ‍ॅक्शन' असे केले जाते.
१९५९ : 'ल्यूना-२' हे मानवविरहित रशियन अंतराळयान चंद्रावर उतरले.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी डार्डानेल्स खाडी पार केली.
१९८० : तुर्कस्तानमधे लष्करी उठाव
१९९८ : डॉ. जयंत नारळीकर यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान
२००२ : मेटसॅट या भारताच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००५ : हाँगकाँगमधील डिस्नेलँड सुरू झाले.
२०११ : हल्ल्यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एक समर्पण समारंभ पार पडल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील स्मारक संग्रहालय सर्वांसाठी सुरु करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९४ : फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यांचा जन्म.
१६८३ : पोर्तुगालचा राजा अफोन्सो सहावा यांचा जन्म.
१७९१ : विद्युतशक्तीचे शास्रज्ञ मायकल फॅरेडे यांचा इंग्लंड येथे जन्म.
१८१८ : गॅटलिंग गन चे संशोधक रिचर्ड जॉर्डन गॅटलिंग यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८०३)
१८९४ : विभूतीभूषण बंदोपाध्याय जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (मृत्यू: १ नोव्हेंबर १९५०)
१८९७ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ मार्च १९५६)
१९१२ : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९६०)
१९४८ : मॅक्स वॉकर ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि फूटबॉलपटू (मृत्यू:)
१९७७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू नेथन ब्रॅकेन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : ऑस्ट्रेलियाचे चौथे पंतप्रधान जॉर्ज रीड यांचे निधन.
१९२६ : विनायक लक्ष्मण भावे मराठी साहित्य संशोधक, ग्रंथकार आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी साहित्येतिहास ग्रंथाचे लेखक, १८९३ मध्ये त्यांनी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. (जन्म: १८७१)
१९५२ : रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा 'सवाई गंधर्व' हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे शिष्य, पं भीमसेन जोशी आणि गंगुबाई हनगळ यांचे गुरू, दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली. (जन्म: १९ जानेवारी १८८६)
१९७१ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते सतीश दुभाषी यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: १४ डिसेंबर १९३९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री शांता जोग यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: २ मार्च १९२५)
१९९२ : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ३१ डिसेंबर १९१०)
१९९३ : अमेरिकन अभिनेता रेमंड बर यांचे निधन.
१९९६ : पं. कृष्णराव रामकृष्ण चोणकर मराठी व गुजराती संगीत नाट्य सृष्टीतील गायक अभिनेते, एक तपाहून अधिक काळ 'गंधर्व नाटक मंडळी'मध्ये नटसम्राट बालगंधर्वांचे नायक म्हणून त्यांनी काम केले. (जन्म:)
१९९६ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा ॲटम बॉम्ब' असे छापले जात असे. (जन्म: ७ जुलै १९४८)





राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# वर्षानुवर्षेची घरे पडण्याच्या भितीने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण

## नुकसान भरपाईशिवाय कारवाई करू नये, ग्रामस्थांचा सार्वजनिक बांधकाम विभागाला इशारा

अंबड। प्रतिनिधी

मठ पिंपळगाव येथील अनेक ग्रामस्थांना सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबड यांच्याकडून रस्त्यालगतच्या अतिक्रमणाबाबत नोटिसा बजावण्यात आल्याने गावात खळबळ उडाली आहे. अतिक्रमणाच्या नावाखाली आपली घरे पाडली जाणार का? या चिंतेने अनेक कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी कारवाईपूर्वी वस्तुस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची मागणी केली आहे. उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग अंबड यांना दिलेल्या निवेदनात ग्रामस्थांनी म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोटिसीत रा.मा.-२२५ ते लोणार-भायगाव-मठ पिंपळगाव रस्ता/प्रजिमा-१७ या मुख्य रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस १५ मीटर



जागा, म्हणजेच एकूण ३० मीटर रुंदीची जागा, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ मधील कलम २० तसेच शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल १९६७ च्या अनुषंगाने शासकीय जागा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या जागेत रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटरच्या आत अनधिकृत अतिक्रमण झाल्याचे नोटिसीत सूचित करण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे की, आम्ही मठ पिंपळगाव येथील गावठाण क्षेत्रात गेल्या अनेक पिढ्यांपासून वास्तव्यास आहेत. आम्हाला विविध शासकीय घरकुल योजनांचा लाभही मिळालेला आहे. यामध्ये इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना तसेच राजीव गांधी घरकुल योजना क्रमांक १ व २ आदी योजनांचा समावेश आहे. या योजनांतर्गत घरकुलांचा लाभ मिळाल्याचे पुरावेही निवेदनासोबत जोडण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे आता अतिक्रमण काढण्याच्या नोटिसा मिळाल्याने शासकीय योजनांतून मिळालेली आणि पिढ्यान्?पिढ्या वास्तव्यास असलेली घरेच धोक्यात येणार का? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.या प्रकरणामुळे मठ पिंपळगावमध्ये सध्या 'नोटिसीनंतर पुढे काय?' याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले असून, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. सदर निवेदनावर प्रा. रमेश गाढे, अशोक घुले, कडुबा घुले,रमेश घुले, करण घुले,रावसाहेब सोनवणे,रामकौर सोनवणे,राजु ढिलपे, वनाबाई ढिलपे, करण ढिलपे,दत्ता ढिलपे, सूरज घुले, बळीराम ढिलपे, पंढरीनाथ ढिलपे, मोहन ढिलपे, कमलबाई सोनवणे, रविंद्र ढिलपे, भिमराव ढिलपे, रमेश घुले यांची नावे आहेत.

**'घरे गेली तर राहायचे कुठे?'**

ग्रामस्थांनी आपल्या निवेदनात भावनिक आवाहन करत म्हटले आहे की, आम्ही गावाच्या कुसाबाहेर राहणारे वंचित, शोषित व दलित घटकातील नागरिक आहोत. आमची घरे पाडली गेल्यास आम्ही राहायचे कुठे? हा आमच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ अतिक्रमण म्हणून कारवाई न करता संबंधित घरांची, गावठाणाची तसेच शासकीय योजनांतर्गत झालेल्या बांधकामांची वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**नुकसान भरपाईशिवाय कारवाई केल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा**

ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला स्पष्ट इशारा देताना म्हटले आहे की, संबंधित बांधकामे रस्ता रुंदीकरण अथवा अन्य शासकीय कामासाठी बाधित होत असतील, तर नियमानुसार नुकसानभरपाई दिल्याशिवाय कोणतेही काम सुरू करू नये. नुकसानभरपाई न देता कारवाई किंवा काम सुरू केल्यास या अन्यायाविरोधात सनदशीर मार्गाने न्यायालयीन लढा लढून न्याय मिळवू,असा इशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

## गणेशोत्सव शांततेत साजरा करून प्रशासनाला सहकार्य करा-रामेश्वर रेंगे

मंठा। प्रतिनिधी

मंठा शहरात गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सर्वधर्मीयांच्या सहभागातून साजरा करण्याची मागील अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे. ही परंपरा यंदाही कायम ठेवत गणेशोत्सव शांततेत व आनंदात साजरा करण्यासाठी सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांनी केले. मंठा पोलीस स्टेशन मध्ये शुक्रवार ता. ११ रोजी शांतता कमिटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, नायब तहसीलदार कल्याण काळदाते, उदयसिंह बोराडे, जे.के. कुरेशी, कयूमभाई कुरेशी, सचिन बोराडे, बाजखा पठाण, सिराज पठाण, आर आर कुलकर्णी, उबेद बागवान, वीज वितरण कंपनीचे श्री शेटे, गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी व शांतता कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी सांगितले की, मंठा शहरात मुस्लिम बांधवांकडून गणेश मंडळांच्या



पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून विसर्जन मिरवणुकीवर फुलांची उधळण केली जाते. सामाजिक सलोखा आणि एकतेचा संदेश देणारी ही परंपरा मंठा शहराची विशेष ओळख निर्माण करणारी आहे. गणेशोत्सवाच्या काळात वीज पुरवठा खंडित होणार नाही, यासाठी महावितरण कंपनीने विशेष काळजी घ्यावी. अशी सूचना केली. श्री गणेश उत्सव शांततेत साजरा करण्यासाठी गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे यांच्यासह विविध गावचे पोलीस पाटील, गणेश मंडळाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, महिला भगिनी व पत्रकार उपस्थित होते.

## खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या

### दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांकडे आ. निलंगेकर यांची मागणी

लातूर। प्रतिनिधी

शेतकयांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी खरीप हंगाम अत्यंत महत्वाचा आहे. मात्र, लातूर जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्याने खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाचा खंड पडल्याने खरीप पीकांचे मोठे नुकसान झाले असून या पीक नुकसानीचे पंचनामे होवून शेतकयांना तत्काळ मदत द्यावी. त्याचबरोबर निर्माण होणारी चारा टंचाई लक्षात घेता पशुधनासाठी चारा डेपो सुरु करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री, आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे.

लातूर जिल्ह्यात ९६ टक्के क्षेत्रावर खरीप हंगामाची पेरणी झालेली आहे. यामध्ये सोयाबीन, तूर, मूग, उडीदसह विविध पिकांचा समावेश आहे. पाऊस वेळेवर पडेल या आशेवर शेतकयांना पेरणी केली असली तरी यावर्षी पावसाने गरजेच्या वेळी हुलकावणी दिलेली असून यावर्षी जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झालेला असून गेली ४५ दिवस पावसाचा खंड पडला अहे. परिणामी जिल्ह्यातील जलाशये कोरडी पडू लागलेली असून भूजल पातळीही झपाट्याने घटली आहे. यामुळे शेतकयांना सिंचनाद्वारेही खरीप पीके जगवणे शक्य होत नाही. जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून खरीपाचा हंगाम हातातून जाण्याची भीती आहे. त्यामुळे खरीप पिकांचे नुकसान होवून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला आहे. पर्जन्यमानाअभावी जिल्ह्यात पशुधनासाठी आवश्यक असणारा चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील अनेक शेतकयांचे उदरनिर्वाह पशुधनावर अवलंबुन असल्याने चाराटंचाईमुळे पशुधन जगवणे



शेतकयांसाठी अडचणीचे होणार आहे.

या पार्श्वभूमीवर जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला मदतीचा हात देणे आवश्यक आहे. याकरिता राज्य सरकारने तत्काळ ठोस पाऊले उचलून पीक नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाला निर्देश द्यावेत, तसेच झालेल्या नुकसानीच्या पंचनामा अधारित शासनाच्या मदत व पुनर्वसन धोरणानुसार शेतकयांना आर्थिक मदत करावी, तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी पशुधनासाठी चार डेपो सुरु करावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री, आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे.

## कार्तिकी खेडकर हिने एअर रायफल चॅम्पियन्स स्पर्धेत मिळवले कांस्यपदक

पाथर्डी प्रतिनिधी



गोवा येथे पार पडलेल्या १३ व्या वेस्ट झोन चॅम्पियनशिप स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना पाथर्डी तालुक्यातील मालेवाडी गावचे सुपुत्र मुंबई येथे कार्यरत असलेले विक्रीकर निरीक्षक भिमराव खेडकर यांच्यी सुकन्या कार्तिकी खेडकर हिने सब युथ गटात कांस्य पदक ( ) पटकावले या ऐतिहासिक कामगिरीसह तिने राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी थेट पात्रता मिळवली आहे कार्तिकी सध्या पनवेल येथे भारताची ऑलिम्पिकपटू सुमा शिरूर यांच्या लक्ष्य शूटिंग अकॅडमी मध्ये कोच श्रुती परिहार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्तिकी प्रशिक्षण घेत आहे शुटींगचे धडे गिरवत आहे या दैदिप्यमान यशाबद्दल कार्तिकी खेडकर तिच्या प्रशिक्षाकांसह कुटुबिंयांचे सामाजिक राजकीय क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत असून कार्तिकीच्या पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात १२६ अर्ज प्राप्त-जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी



कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात मंडळस्तरावर १२ शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये आतापर्यंत एकूण १२६ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे. तालुकानिहारय प्राप्त अर्जांमध्ये जालना तालुक्यातील दोन शिबिरांत १३, बदनापूरमधील एका शिबिरात १०, अंबडमधील एका शिबिरात २, घनसावंगीतील दोन शिबिरांत २०, भोकरदनमधील तीन शिबिरांत ५३, जाफराबादमधील एका शिबिरात १६, परतूरमधील एका शिबिरात ६ आणि मंठा तालुक्यातील एका शिबिरात ६ अर्जांचा समावेश आहे. प्राप्त १२६ अर्जांपैकी समितीअंतर्गत ७८, तर गॅझेटअंतर्गत ४८ अर्ज आहेत. काही प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, उर्वरित प्रकरणांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी कळविले आहे.

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात शाडू मातीच्या गणपती मूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न

### परंपरा जपू या आणि पर्यावरण वाचवूया संदेश,विद्यार्थी व शिक्षकांनी साकारल्या सुबक मूर्ती

पाथर्डी । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाथर्डी येथे शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली शैक्षणिक गुणवत्तेसोबतच नाविन्यपूर्ण व समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून पाथर्डी शहरात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या विद्यालयाने या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग संवर्धनाची जाणीव निर्माण केली या कार्यशाळेत आनंद कॉलेज पाथर्डी येथील सूर्यकांत काळोखे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

गणपतीची सुबक मूर्ती साकारण्याची विविध सोपी तंत्रे माती मळण्यापासून ते विविध अवयव जोडण्यापर्यंतच्या बारकाव्यांची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली आणि प्रत्यक्ष मूर्ती बनवून घेतल्या प्रा. सूर्यकांत काळोखे यांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणाऱ्या जलप्रदूषणाची गंभीर समस्या मांडत



शाडू मातीच्या मूर्तींचे पर्यावरणीय महत्त्व पटवून दिले शाडू मातीची मूर्ती विसर्जनानंतर पाण्यात सहज विरघळते आणि मातीत सहज मिसळते त्यामुळे पर्यावरणाची हानी होत नाही यामुळे सर्वांनी शाडू मातीच्याच मूर्तीची स्थापना करावी असे आवाहन त्यांनी केले विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने गणपतीच्या आकर्षक मूर्ती साकारण्याचा मनमुराद आनंद घेतला व स्वतः बनवलेलीच मूर्ती गणेशोत्सवात आपल्या घरी स्थापन करण्याचा संकल्प व्यक्त केला या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे केवळ विद्यार्थ्यांनीच नव्हे तर शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षिकांनीही प्रत्यक्ष मूर्ती तयार करून या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला यावेळी संस्थेचे सचिव महेंद्र शिरसाट हे विद्यालयातील प्रत्येक उपक्रमात स्वतः सहभागी होऊन विद्यार्थ्यांना निरंतर प्रोत्साहन व प्रेरणा देतात त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यालयात सातत्याने अशा विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची मालिका राबवली जात आहे परंपरा जपूया आणि पर्यावरणही वाचवूया असा सुंदर पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे पाथर्डी शहरातून व पालकवर्गाकडून कौतुक होत आहे.

## २५ हजार शेतकऱ्यांची कर्जमुक्तीसाठी तिसरी यादी जाहीर

### ८६२ गावांतील पात्र शेतकऱ्यांचा समावेश

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत जालना जिल्ह्यातील थकबाकीदार पात्र शेतकऱ्यांची तिसरी यादी शुक्रवार (दि. ११) प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत जिल्ह्यातील ८६२ गावातील २५ हजार ८४७ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे.अनियमित पर्जन्य, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि हवामान बदलामुळे शेती व्यवसायासमोर निर्माण झालेल्या अडचणी, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी ही योजना जाहीर केली आहे. योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह प्रतिशेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा यामध्ये समावेश आहे. तसेच ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेल्या पात्र कर्जांनाही योजनेचा लाभ मिळणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असलेली अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर कर्जमुक्तीचा लाभ घेता येणार आहे. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तिसऱ्या यादीतील पात्र शेतकऱ्यांची नावे संबंधित गावातील गावचावडी, ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सहकारी संस्था तसेच संबंधित बँक शाखेत प्रसिद्ध करण्यात येत आहेत. यादीतील शेतकऱ्यांनी आपला विशिष्ट क्रमांक, आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक घेऊन नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन लवकरात-लवरकत आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आधार प्रमाणीकरणासाठी आपले सरकार सेवा केंद्र चालकास कोणतेही शुल्क देण्याची आवश्यकता नाही.

# प्रशिक्षणातून जनसेवा अधिक प्रभावी करण्यास मदत होईल-भास्कर दानवे

## नगरसेवकांचे मुंबईत प्रशिक्षण शिबिर संपन्न

जालना। प्रतिनिधी

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत जालना महानगरपालिका क्षेत्रातील भाजपा नगरसेवकांचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई येथे दि. ८ ते ९ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. भाजपा परिवाराची विचारधारा, पक्षाची संघटनात्मक भूमिका तसेच जनसेवेचे कार्य अधिक प्रभावीपणे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी नगरसेवकांना विविध विषयांवर या प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करण्यात आले. लोकप्रतिनिधींनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या समजून घेत प्रभावीपणे सोडविण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणामध्ये विविध विषयांची माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन राष्ट्रीय महामंत्री तथा महाराष्ट्र प्रभारी शिवप्रकाश यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश महामंत्री राजेश पांडे, सुनील राणे, ना.आशीष शेलार, आ.अतुल भातकळकर,



नितीन काळे, अभिराम घड्याळ पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षण शिबिराचा समारोप ना.अतुलजी सावे यांच्या उपस्थितीत झाला.

या प्रशिक्षण शिबिरातील माझा प्रभाग, आदर्श प्रभाग सूक्ष्म नियोजन, जनसहभाग आणि शाश्वत नागरी विकास' या सत्राच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे होते. या सत्रात प्रभागाचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास करण्यासाठी विश्लेषण, ५ वर्षांचा प्रभाग विकास आराखडा आणि इन्फ्रास्ट्रक्चर ऑडिट याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 'झिरो वेस्ट प्रभाग' संकल्पनेद्वारे स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. नियोजन आणि जनसहभागातून आदर्श व शाश्वत प्रभाग निर्माण करण्याचा संदेश या सत्रातून देण्यात आला. यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत महानगरपालिका नगरसेवकांसाठी आयोजित प्रशिक्षणातून लोकप्रतिनिधींना राजकीय, प्रशासकीय, कायदेशीर तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रभावी प्रशिक्षण मिळाले. महानगरपालिका कामकाजाचे नियम, अर्थसंकल्प व निधी नियोजन, प्रभाग विकास आराखडा, जनसहभाग, सोशल मीडिया तसेच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणामुळे नगरसेवकांची कार्यक्षमता वाढून नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडविण्यास मदत होईल. माझा प्रभाग आदर्श प्रभाग या संकल्पनेतून विकासाभिमुख आणि जनतेशी थेट संवाद साधणारे लोकप्रतिनिधी घडविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. भाजपा संघटन अधिक सक्षम करून विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेला स्थानिक पातळीवर गती देण्यासाठी हे प्रशिक्षण निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल,'' असे मत भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी व्यक्त केले. या प्रशिक्षण शिबिरास जालना येथून भाजपा जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांच्यासह माजी आ.कैलासजी गोरंटयाल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, नगरसेवक संगिताताई गोरंट्याल, महावीर ढक्का, अक्षय गोरंट्याल, सुशीलाताई दानवे, संध्या देठे, रमेश गोरक्षक, कल्याण भदनेकर, पदमा मानधानी, ॲड. भगवान चांदोडे, कपिल भरेवाल, सकुबाई पानबिसरे, संजय पाखरे, वीरेंद्र धोका, संतोष माधोवाले, वर्षा राऊत, मंगल गरदास, महेश निकम, शशिकांत घुगे, अशोक पवार, सिद्धिविनायक मुळे, अर्जुन गेही, शोभा नारियलवाले आणि आनंद झारकंडे सहभागी झाले होते.

# आक्रोश मोर्चानेच काढले प्रशासनाचे वाभाडे

### रामकृष्ण बांगर प्रतिष्ठान मुलींच्या संरक्षणासाठी घेणार आक्रमक भूमिका

पाटोदा । प्रतिनिधी

एक सप्टेंबर रोजी नाळवंडी येथील एका लहान मुलीवर नराधामान केलेला अत्याचार ही प्रशासनाची नाचक्की आहे. प्रशासन कोणतीच दखल घ्यायला तयार नाही. अत्याचार करणारा नराधम हा दारू गांजा इत्यादी व्यवसाय करून अतिक्रमनाच्या जागेवर राहत आहे. त्याच नराधमान हा अत्याचार केल्याने प्रशासनाची मोठी नाचक्की झाली असून प्रशासनाचे मोठे सहकार्य असल्याचे दिसून येत आहे.. याच निषेधार्थ रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानच्या माध्यमातून जन आक्रोश मूक मोर्चाचे आयोजन केलं होतं या मोर्चा मोर्चाला हजारो विद्यार्थी आणि नागरिकांनी प्रतिसाद दिला. तसेच या मोर्चाने प्रशासनाचे चांगलेच वाभाडे काढलेच दिसून आलं..

नाळवंडीतील त्या लहान चिमुकली वरील अत्याचार फक्त हा अत्याचार नसून ती एक विकृती आहे त्या विकृतीला ठेचण्यासाठी रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानच्या माध्यमातून जन आक्रोश मूक मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला या मोर्चामध्ये हजारो विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच नागरिकांनी सहभाग नोंदवत या मोर्चातून न्याय मागण्याचा प्रयत्न केला. या मूक मोर्चा न प्रशासनाचे चांगलेच





वाघाडे काढलेच दिसून आलं. बाळा बांगर यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाकडून नव्हती प्रशासनाची अक्षरशा ततमम झाल्याचं पाहायला मिळालं. या मोर्चातून प्रशासन किती हलगदरीपणात आहे हे दिसून आलं. प्रशासनाकडे कोणत्याच प्रश्नांची उत्तरे नव्हती विद्यार्थ्यांनी तर भाषणातून डायरेक्ट प्रशासनावरच आरोप केले की दारूचे दुकान गांजा विकणाऱ्यांनाच पाठिंबा प्रशासन घेते की काय तक्रारी करूनही दारू विकणाऱ्याला बंदी केली जात नाही गांजा विकणारा अडवणूक केली जात नाही मात्र ज्यांच्यावर अत्याचार झाला त्यांनाच न्याय मिळण्यासाठी आंदोलन करावी लागतात ही शोकांतिकाय. त्या मोर्चाचे नेतृत्व विजयसिंह बाळा बांगर यांनी केले तर यावेळी त्यांनी प्रशासनाचे चांगलेच वाघाडे काढले. या मोर्चातून हभप. रंधवे बापू महाराज, रामकृष्ण बांगर ,एकबाल पेंटर, श्रीहरी पवार, महादेव नागरगोजे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष आनंद जाधव, गुलाब भाऊ घुमरे, दादाराव घुमरे, सत्यभामाताई बांगर, सोनाली येवले, तात्यासाहेब हले, प्राचार्य विवेक कदम सर ,प्राचार्य राख सर, प्राचार्य तुपे सर , प्रवक्ते महेबुब शेख, मराठा सेवक बाबा तिपटे, गणेश कवडे, संदीप जाधव,बालाजी जाधव, शिवसेना मुकुंद शिंदे, राष्ट्रवादीचे दीपक घुमरे, भाई विष्णुपंत घोलप, हुले बापू, शिवाजी काकडे, डॉ.पठाण सर, कैलास पन्हाळकर, किशोर काकडे, बाप्पा हुले, दशांत येवले, प्रा.सचिन पवार, दत्ता कोकाटे,भगवान शिंदे, सचिन सातपुते, मनाजी सातपुते, योगेश गायकवाड, श्याम हले, शिवाजी ढेरे, रमेश कदम यांच्या सहकार्यातून हा मोर्चा यशस्वी झाला तर अनेकांनी भाषणातून प्रशासनावर ताशेरे ओढत त्याची मुकलीला न्याय द्यावा आणि मुलींना संरक्षण देण्यासाठी कठोरात कठोर पावलं उचलावेत असे आव्हान केले. या मोर्चासाठी पाटोदा ◀◀ पान ३ वर

# कानडी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ.आशाताई वलवळे यांची बिनविरोध निवड

### आ.सुरेश धस यांच्या समर्थक युवा उद्योजक राजेंद्र वलवळे यांच्या मातोश्रींचा सन्मान; ग्रामस्थांमध्ये उत्साह

**आष्टी । प्रतिनिधी**

**कानडी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी सौ. आशाताई आण्णासाहेब वलवळे यांची आज दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे ग्रामपंचायतीच्या कारभारात अनुभवी नेतृत्वाला संधी मिळाल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.**

मराठवाडा भूषण आमदार सुरेश (आण्णा) धस यांचे कट्टर



समर्थक तथा युवा उद्योजक राजेंद्र वलवळे यांच्या मातोश्री सौ. आशाताई वलवळे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याने वलवळे कुटुंबीयांसह समर्थक व ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. या निवड प्रक्रियेत लोकनियुक्त सरपंच श्री. गणेश रावसाहेब खिळे यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. ग्रामविकास अधिकारी माळेकर साहेब, मंडळ अधिकारी औंधकर साहेब तसेच तलाठी चव्हाण साहेब यांनी निवड प्रक्रियेची प्रशासकीय जबाबदारी पार पाडली. उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर सौ. आशाताई वलवळे यांचा उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या विकासाला गती देत सर्व ◀◀ पान ३ वर

# चुकीच्या माहितीच्या आधारे पदावन्नती

### कनिष्ठ सहाय्यक ज्ञानेश्वर कुलकर्णी यांचे राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे अपील दाखल

बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीचे कर्मचारी ज्ञानेश्वर सुधाकर कुलकर्णी हे जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असताना २००६ मध्ये त्यांची पदोन्नती झाली. मात्र पदोन्नती समितीला चुकीची माहिती दिल्यामुळे पुन्हा त्यांना पदावन्नत करण्यात आले. पुन्हा त्यांना पदोन्नती देण्यासाठी तब्बल सोळा वर्षाचा काळ लोटला. त्यांना सन २०१९ मध्ये पुन्हा पदोन्नती देण्यात आली. मात्र हा त्यांच्यावर अन्याय असल्याची त्यांची भावना असून त्यांना २००६ पासून सर्व लाभ मिळावेत अशा मागणीचे आपिल त्यांनी ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे १६ जुलै २०२६ रोजी दाखल केलेले आहे.

या अपिलात ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी म्हटले आहे की मी २७- ९- १९९३ पासून शिपाई पदावर कार्यरत होतो. २००६ मध्ये सेवा जेष्ठता सूची प्रमाणे मला पदोन्नती देण्यात आली. मात्र वरिष्ठांना माझ्याबद्दल चुकीची माहिती देऊन आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेने चुकीच्या पद्धतीने तक्रारी करून मला पुन्हा पदावन्नत करण्यात आले. या संदर्भात विभागीय आयुक्तांकडे मी दाद मागितली मात्र विभागीय आयुक्तांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे आदेश कायम ठेवले. यासंदर्भात कुलकर्णी यांनी ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे दाद मागितली असून त्यांना २००६ पासूनचे लाभ मिळावेत अशी त्यांची मागणी आहे. याबरोबरच पदोन्नती समितीच्या बैठकीत चुकीची माहिती पुरवणाऱ्या कर्मचारी विरुद्ध कोणती प्रशासकीय कारवाई केली याचा खुलासा करण्याची मागणी त्यांनी केली आहे. सन १९९१ ते सन २००६ या कालावधीत सर्व पदोन्नती कर्मचाऱ्यांवर कुठलीही पदावन्नतीची कारवाई केली नाही. केवळ माझ्यावर ही कारवाई करण्यात आली. माझी कुठलीही चूक नसताना माझ्यावर हा अन्याय करण्यात आला आहे.

# पाटोदा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

### तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन, २८ सप्टेंबरला आंदोलनाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यामध्ये १ जून २०२६ पासून अजिबात पाऊस न पडल्याने अत्यंत गंभीर दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पाटोदा तालुका 'कोरडा दुष्काळ' म्हणून जाहीर करावा, यासह विविध प्रमुख मागण्यांचे निवेदन आज (१० सप्टेंबर २०२६) स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने पाटोदा तहसील कार्यालयात तहसीलदारांना देण्यात आले. मागण्यांची तात्काळ दखल न घेतल्यास २८ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयादरम्यान जनमोर्चा व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या:

दुष्काळ व विमा: पाटोदा तालुका अधिकृतपणे कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करावा आणि सर्व शेतकऱ्यांना विनाअट १००% पीक विमा मंजूर करावा. आर्थिक मदत व मजुरी: शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, तसेच ऊसतोड मजुरांना प्रतिटन ६०० रुपये मजुरी लागू करावी. पाणी व चारा छावण्या: तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर तात्काळ



सुरू करावेत आणि जनावरांसाठी चारा छावण्या मंजूर कराव्यात.

रोजगार व मनरेगा: मजुरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या सर्व विहिरींचे मस्टर काढण्यास तात्काळ परवानगी द्यावी. इतर मागण्या: तलावातील गाळ काढून तो शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी उपलब्ध करावा. सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी, तसेच श्रावणबाळ व संजय गांधी योजनेतील निराधारांना दरमहा ५,००० रुपये मानधन देण्यात यावे. प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांना दिलासा न दिल्यास होणाऱ्या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर राजाभाऊ गणपतराव देशमुख, विष्णुपंत रामभाऊ घोलप, महादेव नाना नागरगोजे, नामदेव सुग्रीव सानप, नरहरी यादवराव पवळ, चक्रपाणी लक्ष्मणराव जाधव, मुकुंद शिंदे आणि बाळासाहेब चौरे यांच्यासह तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

# ट्रक -दुचाकीचा अपघात :तीन मित्रांचा मृत्यू!

बीड । प्रतिनिधी

बीड नजीक असलेल्या उखंडा तलावाजवळ ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन तरुण मित्रांचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. हे तिघे तरुण नवगण राजुरी येथील रहिवाशी असून या घटनेमुळे परिसरावर शोककळा पसरली आहे.

कैलास टुले, ऋषिकेश फुलझळके आणि अक्षय शिंदे अशी मृतांची नावे आहेत. अहिल्यानगर बीड महामार्गाचे काम सध्या सुरु आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी खड्डे तसेच अर्धवट पूल आहेत. उकंडा तळ्याजवळ पुलाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी त्यांच्या दुचाकीला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की तिघांचाही जागीच मृत्यू झाला.दरम्यान, पुलाच्या कामाच्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक दिशादर्शक फलक, रेडियम पट्टे अथवा इतर सुरक्षाव्यवस्था नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. बीड-नवगण राजुरी मार्गाचे राष्ट्रीय महामार्गाचे




काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. बांधकामाच्या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था करणे अपेक्षित असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने हा अपघात घडल्याचा आरोप होत आहे.

# कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी संजय ढोबळे तर उपसभापतीपदी रामदास शेंडगे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अद्वैतचंद्र निवासस्थानी. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे मावळते सभापती



### सभापती संजय ढोबळे, उपसभापती रामदास शेंडगे यांचा अद्वैतचंद्र निवासस्थानी सन्मान

रमजान तांबोळी यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.

कृषी बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत बाजार समितीच्या विकासाला गती देणे, तसेच शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, ही अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. नवनिर्वाचित सभापती संजय ढोबळे व उपसभापती रामदास शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीच्या विकासासाठी आणि शेतकरीहितासाठी उल्लेखनीय काम घडेल, असा विश्वास व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# बैलपोळा मिरवणुकीत डीजे वाजवणाऱ्यांवर गेवराई पोलिसांचा दणका; डीजे जप्त, तिघांवर गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

पोळा सणानिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत कायद्याचे उल्लंघन करून आणि मानवी शरीर तसेच मुक्या प्राण्यांना अपायकारक ठरेल अशा कर्कश आवाजात डीजे वाजवणाऱ्यांवर गेवराई पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत बेकायदेशीरपणे डीजे वाजवणारे वाहन जप्त करण्यात आले असून, डीजे चालक, मालक व मिरवणूक मंडळाच्या सदस्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी पोळा सण आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर




जिल्ह्यात कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तसेच मानवी आरोग्यास व प्राण्यांना धोकादायक ठरणाऱ्या कर्कश आवाजातील डीजे सिस्टीमवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी हद्दीतील डीजे चालक व मालकांची बैठक घेऊन जनसामान्यांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आणि बैलपोळा मिरवणुकीत डीजे किंवा डॉल्बी सिस्टीम न वाजवण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते.

दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी बैलपोळा सणानिमित्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस ठाणे हद्दीत चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस पथक पेट्रोलिंग करत असताना गेवराई तालुक्यातील बेलगाव येथे बैलपोळा मिरवणुकीसमोर विनापरवाना डीजे वाजत असल्याचे निदर्शनास आले. वाहनाच्या मूळ संरचनेत अनधिकृतपणे बदल करून (वाहन क्र. -१६--०३९६) अत्यंत कानठळ्या ◀◀ पान ३ वर

# बीड जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करा; शेतकरी, शेतमजूर व पशुपालकांसाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात यावर्षी पावसाने मोठी ओढ दिल्याने अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी, मूग, उडीद यांसह खरीप पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे. पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिके करपण्याच्या अवस्थेत आहेत. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात तात्काळ 'कोरडा दुष्काळ' जाहीर करून शेतकरी, शेतमजूर, पशुपालक, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांसाठी दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात,अशी मागणी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सर्व पक्षीय पदाधिकारी यांच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्याकडे दि १० सप्टेंबर गुरुवार रोजी देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यात शेतकऱ्यांनी पेरणी,खते, औषधे,मजुरी व मशागतीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पादन धोक्यात आले आहे. दुसरीकडे शेतमजुरांना शेतीची कामे उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. जनावरांसाठी चारापाण्याचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तसेच निवेदनात पुढील प्रमाणे प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.त्यामध्ये बीड जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा,शेतकऱ्यांना हेक्टरी नुकसान भरपाई द्यावी,गुरांसाठी तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात,शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना दुष्काळी किट रेशन व्यवस्थेद्वारे मोफत वितरित करावे,शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे,शेतमजुरांच्या हाताला तात्काळ काम उपलब्ध करून द्यावे,विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे,पिण्याच्या पाण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात,वीजबिल व वीज जोडणीबाबत शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, पीकविमा नुकसान भरपाई तातडीने द्यावी, पशुधनासाठी विशेष मदत उपलब्ध करून द्यावी,पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना मोफत अथवा अनुदानित बियाणे व खते द्यावीत,दुष्काळी परिस्थितीत सर्व शासकीय वसुलीला स्थगिती द्यावी,गावनिहाय दुष्काळ नियंत्रण कक्ष सुरू करावेत,दुष्काळग्रस्त कुटुंबांना थेट आर्थिक मदत द्यावी,बीड जिल्ह्यातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून केवळ आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. शासनाने वरील मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करावी; अन्यथा प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्याकडे दि. १० सप्टेंबर ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रीय गणेश मंडळाच्या कार्याध्यक्षपदी शेख मुसा यांची निवड; बीडमधून सामाजिक सलोख्याचा नवा आदर्श

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड भागातील ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या 'राष्ट्रीय गणेश मंडळा'चे यंदा ६३ वे वर्ष असून, ८ सप्टेंबर



अमृत सारडा
मुख्य मार्गदर्शक

शेख मुसा
कार्याध्यक्ष

आकाश ईगडे
अध्यक्ष

रोजी मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. राजकीय, सामाजिक आणि धार्मिक विविधतेतही जातीय सलोखा जपणाऱ्या बीड शहरात राष्ट्रीय गणेश मंडळाने पुन्हा एकदा सामाजिक ऐक्याचा नवा आदर्श निर्माण केला आहे. मंडळाच्या कार्याध्यक्षपदी मुस्लिम समाजातील कार्यकर्ते शेख मुसा भाई यांची सर्वानुमते निवड करून मंडळाने सर्वधर्मसमभावाचा एक भक्कम संदेश दिला आहे.

ज्येष्ठ समाज सेवक अमृत काका सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सतीश आप्पा हारके, किरण मुंडला, मिलिंद महाजन व विजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत या नूतन कार्यकारिणीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता हिंदू-मुस्लिम ऐक्याची वीण अधिक घट्ट करणारी ही निवड सध्या शहरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

नूतन कार्यकारिणी मध्ये मुख्य प्रवर्तक म्हणून अमृत काका सारडा,कार्याध्यक्ष शेख मुसा भाई, अध्यक्ष आकाश सुरेशराव इगडे, उपाध्यक्ष कुणाल सपकाळ, वरद मुसळे, कोषाध्यक्ष राजेश सारडा, भगवान इगडे, अमोल शेटे, सचिव विनोद शिंदे, श्री गजानन पायगुडे, सहसचिव उदय मुसळे, री भाग्येश बिराजदार, व्यवस्थापक बाला जाधव, गणेश वाघुले, शैलेश सपकाळ, सहव्यवस्थापक शंतनू भावसार, संजय वाघुले, राजेश ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26